cmyk

## संपादकीय

### पाक मधील उद्रेक आणि भारत

पाकिस्तानचा आदर करा, त्यांच्याकडे अणुबॉम्ब आहे, अशा आशयाचे वक्तव्य असणारी काँग्रेस नेते मणिशंकर अय्यर यांची चित्रफीत प्रचाराच्या रणधुमाळीत व्हायरल करण्यात आली आणि त्यावरून पंतप्रधान मोदींसह सत्ताधारी भाजपने काँग्रेसवर भडिमार सुरू केला आहे. या मुद्याबरोबरच ओघाने पाकव्याप्त काश्मीरचा (पीओके) मुद्दाही प्रचाराच्या केंद्रस्थानी आला आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी 'पाकव्याप्त काश्मीर भारतात येण्यासाठी युद्ध करण्याची गरजच पडणार नाही,' असा दावा केला आहे,


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र वर्ष - ४ अंक-३५ गुरूवार दि.१६ मे २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने- ६ किंमत ३ रूपये


### नैऋत्य मान्सून केरळात ३१ मे रोजी दाखल होणार

मुंबई : मान्सूनची आतुरतेने वाट पाहणाऱ्या सर्वसामान्य आणि शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. मान्सूनच्या आगमनाची तारीख समोर आली आहे. उन्हाच्या कडाक्या हैराण झालेल्यांसाठी ही दिलासादायक बातमी आहे. नैऋत्य मान्सून यंदा काही दिवस लवकर केरळात दाखल होण्याची शक्यता आहे. यंदा मे महिन्याच्या अखेरीस नैऋत्य मान्सून केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. मान्सून आगमनाच्या बातमीमुळे शेतकऱ्यांसह सर्वांनाच दिलासा मिळाला आहे. नैऋत्य मान्सून केरळात ३१ मे रोजी दाखल होण्याची शक्यता असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

# टोमॅटोची लाली उतरली!

## ग्राहकांना फायदा शेतकऱ्यांना मात्र फटका; सरकार लक्ष देईना

**पुणे । प्रतिनिधी**

**सध्या टोमॅटो उत्पादक शेतकरी अडचणीत सापडले आहेत. कारण टोमॅटोच्या दरात मोठी घसरण झाली आहे. टोमॅटोच्या दरात जवळपास ४० टक्क्यांची घसरण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसतो आहे. चांगला दर न मिळाल्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. दुसरीकडे शेत मालाचे भाव घसरले तरी सरकार लक्ष द्यायला तयार नाही.**



सध्या टोमॅटो उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत. कारण दरात घसरण होत आहे. एका बाजूला देशात तापमानात वाढ होत आहे. त्यामुळे टोमॅटोच्या मागणीत वाढ होत आहे. मागणी वाढली तरी दर मात्र वाढत नसल्याचे दिसत आहे. दरात घसरणच होत आहे. उत्तर प्रदेशमध्ये अनेक राज्यातून टोमॅटोची आवक होत असल्याचे दिसत आहे. आवक वाढल्यामुळे दरात घसरण झाल्याची माहिती अभ्यासकांनी दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, टोमॅटोच्या दरात ४० टक्क्यांची घसरण झाली आहे. उत्तर प्रदेशात टोमॅटोचा प्रति क्किंटल किमान भाव १६०० रुपयापर्यंत इतका खाली आला आहे. ◀◀ पान २ वर

### टोमॅटोत घसरण, बटाट्याच्या दरात वाढ

» एका बाजूला टोमॅटोच्या दरात घसरण होत असताना दुसरीकडे बटाट्याच्या दरात मोठी वाढ होत आहे. गेल्या ३० दिवसांत बटाट्याच्या दरात १२ टक्क्यांची वाढ झाली आहे. वर्षभराच्या तुलनेत बटाट्याच्या दरात सुमारे ३७ टक्क्यांनी वाढ झाली आहे. हवामान आणि तापमानातील बदल पाहता येत्या काही महिन्यांत बटाटे आणि इतर काही भाज्यांच्या किंमतीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी विरोधात नाशिकमध्ये शेतकरी आक्रमक

**नाशिक । प्रतिनिधी**

**नाशिक आणि दिंडोरी लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी २० मे रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर भाजप उमेदवाराच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी नाशिक दौऱ्यावर असल्याने या सभेकडे देशाचे लक्ष लागलेले असतानाच लासलगावला कांद्याच्या माळा घालून शेतकऱ्यांनी आंदोलन केले आहे.**



महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पिंपळगाव बसवंत येथील सभेअगोदरच लासलगाव येथे शेतकऱ्यांनी बुधवारी सकाळी कांद्याच्या माळा घालून कांद्याची संपूर्ण निर्यात बंदी हटवण्यासाठी जोरदार घोषणाबाजी करत आंदोलन केले. यावेळी लासलगाव पोलिसांनी कांद्याच्या माळांसह १५ शेतकऱ्यांना ताब्यात घेतले आहे. तर शेतकरी व्हॉट्सअॅप ग्रुप अॅडमिन ◀◀ पान २ वर

## *नकली राष्ट्रवादी, नकली शिवसेना काँग्रेसमध्ये विलीन होणार - मोदी*

**दिंडोरी । प्रतिनिधी**

**नकली शिवसेना व नकली राष्ट्रवादीचे काँग्रेसमध्ये विलीन होणे निश्चित आहे. नकली शिवसेना अस्तित्वातच राहणार नाही. नकली शिवसेना जेव्हा काँग्रेसमध्ये विलीन होईल. तेव्हा मला पहिली आठवण बाळासाहेब ठाकरे यांची होईल. कारण, ज्या दिवशी शिवसेनेला काँग्रेससोबत जावे लागेल तेव्हा मी पक्षाचे काम बंद करेल असे बाळासाहेबच म्हणाले होते अशी आठवण मोदींनी करुन दिली.**




नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी लोकसभा मतदारसंघाच्या भाजप महायुतीच्या उमेदवार डॉ. भारती पवार यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पिंपळगाव येथे (दि.१५) रोजी सभा पार पडली. यावेळी पंतप्रधान मोदींनी राष्ट्रवादी व शिवसेना पक्षावर जोरदार हल्लाबोल केला. विकसीत भारतासाठी आशीर्वाद मागण्यासाठी आलो असल्याचे मोदी म्हणाले. ◀◀ पान २ वर

## ७० हजार कोटींचा उपमुख्यमंत्री, मग मुख्यमंत्री कितीचा असेल

### उद्धव ठाकरे यांचा खोचक सवाल

**नाशिक । प्रतिनिधी**

**७० हजार कोटींचा उपमुख्यमंत्री मग, मुख्यमंत्री कितीचा असेल, असा सवाल ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला आहे. चोराच्या हातात धनुष्यबाण दिले पण, मशाल बघा कशी पेटलेली आहे. राजकारणात भाजपला पोरंच होत नाहीत. म्हणून त्यांना नकली संतान, आपल्याकडचे गद्दार मांडीवर घ्यावे लागले आहेत, असे वक्तव्य उद्धव ठाकरे यांनी नाशिकच्या सभेत केले आहे. नाशिकमध्ये बुधवारी राजाभाऊ वाजे यांच्या प्रचारार्थ महाविकास आघाडीची भव्य सभा पार पडली. या सभेत उद्धव ठाकरेंनी सरकारवर निशाणा साधला.**



हिंदुहृदयसम्राट शिवसेनेचे प्रमुख बाळासाहेब ठाकरेंनी स्वत: शिवसेनेची जबाबदारी माझ्यावर सोपवली. तरीदेखील काही पावटे, आपल्या शिवसेनेला नकली शिवसेना म्हणतात. आपल्या शिवसेनेला नकली शिवसेना म्हणणारे पावटे, या पावट्यांना कुठे मोड फुटले आहेत, माहित नाही. यांची इथपर्यंत मजल गेली की, हिंदुहृदयसम्राटांचा मी पुत्र आणि तेलंगणाच्या भाषणामध्ये ते मला नकली संतान ◀◀ पान २ वर

## विदर्भ, मराठवाड्यात पावसाचा अंदाज राज्यात ठिकठिकाणी वादळी पावसाची शक्यता

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यातील काही भागात उष्णतेची लाट तर काही भागात ढगाळ वातावरणासह वादळी पाऊस पडत आहे. हवामान विभागाने पुढील चार दिवस राज्यातील काही भागात वादळी पावसाचा अंदाज दिला. तर काही भागात उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे.**



हवामान विभागाने कोकणातील काही भागात उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला. तर काही भागात वादळी पावसाचा अंदाज दिला. तसेच रत्निगारी, रायगड, कोल्हापूर, नाशिक, धुळे आणि जळगाव जिल्ह्यात वादळी पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला. तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, खानदेश आणि विदर्भाती काही ठिकाणी विजा आणि मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज दिला.

तसेच गुरूवारी नगर आणि नाशिक जिल्ह्यातही वादळी पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, खानदेश ◀◀ पान २ वर

## गर्भवतींना पोस्टल बॅलेटद्वारे मतदान परवानगीबाबत विचार करा-उच्च न्यायालय

**मुंबई । प्रतिनिधी**

**गर्भवती महिलांना पोस्टाद्वारे मतदान करण्याची परवानगी देण्याबाबत विचार करा, अशी सूचना नुकतील तेलंगणा उच्च न्यायालयाने केंद्रीय निवडणूक आयोगाला केली आहे. या प्रकरणी दाखल जनहित याचिका तेलंगणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश धीरज सिंह ठाकूर आणि न्यायमूर्ती आर रघुनंदन राव यांनी निकाली काढल्याचे वृत्त दिले आहे.**

१९५१च्या लोकप्रतिनिधी कायद्याच्या कलम ६० नुसार पोस्टल बॅलेटद्वारे मतदान करण्यास पात्र म्हणून कोणत्याही वर्गाला सूचित करण्याचा अधिकार केंद्रीय निवडणूक आयोगाला आहे. ८५ वर्षांपेक्षा अधिक वय असणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना पोस्टल बॅलेटद्वारे मतदानाची परवानगी देण्यात आली आहे. तशीच तरतूद केंद्रीय निवडणूक आयोगाने गर्भवती महिलांसाठी करावी. त्यांनाही पोस्टल बॅलेटद्वारे मतदानाचा हक्क बजावण्याची परवानगी देण्यात यावी. याबाबत अधिसूचना जारी करावी, शी मागणी याचिकाकर्त्याने केली होती. या याचिकेवर तेलंगणा ◀◀ पान २ वर

## एक कोटींची लाच : बीडच्या आर्थिक गुन्हे शाखेतील कर्मचारी एसीबीच्या रडारवर

**बीड । प्रतिनिधी**

जिजामाता मल्टीस्टेटच्या गुन्ह्यात सहकार्य करण्यासाठी तब्बल १ कोटी रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी बीड आर्थिक गुन्हे शाखेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर बीड एसीबीने कारवाई केली आहे. याप्रकरणात तब्बल पाच लाख रूपये घेताना एका खासगी व्यक्तीला ताब्यात घेण्यात आले आहे. याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक हरिष खाडे, हे. कॉ. जाधवर, कुशाल प्रविण जैन या तिघांवर गुन्हा दाखल होण्याची शक्यता आहे. या प्रकरणी बीड एसीबीचे डीवायएसपी शंकर शिंदे यांनी आक्रमक भुमिका घेतली आहे.

शिंदेंनी केलेल्या कारवाईमुळे जिल्हा पोलिस दलात मोठी खळबळ उडाली आहे. जिल्ह्यात मागच्या काही काळात मल्टीस्टेटचे अनेक घोटाळे समोर आले. त्यात आर्थिक गुन्हे शाखेची भुमिका कायम संशयास्पद राहिली. त्यातच आता जिजामाता मल्टीस्टेटच्या प्रकरणात ◀◀ पान २ वर

## नरेंद्र मोदींच्या सभेसाठी शासकीय यंत्रणेचा गैरवापर

### अंबादास दानवे यांचा आरोप, अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी मुख्य निवडणूक आयुक्त यांना पत्र

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात लोकसभा निवडणूक कार्यक्रम जाहिर करण्यात आला असून लोकसभा निवडणूक २०२४ चे कामकाज सुरु झाले आहे. त्यासाठी केंद्रिय निवडणूक आयोगाकडून आदर्श आचारसंहिता जाहिर करण्यात आलेली आहे. असे असताना प्रभारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेसाठी मोठया प्रमाणात रस्त्याच्या डागडुजीची कामे करण्यात आली असून, स्वच्छतेसाठी स्थानिक प्रशासनाकडून मोठया प्रमाणात खर्च करण्यात आला आहे. एक प्रकारे हा निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या आदर्श आचारसंहितेचा भंग आहे. त्यामुळे याप्रकरणी चौकशी करुन आदर्श आचारसंहितेचा भंग केल्या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर नियमानुसार उचित कारवाई करावी, अशी मागणी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मुख्य निवडणूक आयुक्त यांना पत्राद्वारे केली.

अंबादास दानवे पुढे आपल्या पत्राद्वारे म्हणाले की, देशभरात स्वतंत्र आणि निष्पक्ष निवडणूक व्हावी यासाठी निवडणूक आयोगाने मार्गदर्शक तत्वे जाहीर केली आहेत. त्याप्रमाणे राज्यात सर्वत्र राजकीय पक्षांकडून त्यांचे पालन करुन नेत्यांच्या सभा सुरु आहेत. परंतु देशाचे पंतप्रधान यांच्या दौऱ्याच्या वेळी अनेक ठिकाणी या आचारसंहितेचा भंग करुन ज्या ठिकाणी त्यांच्या सभा होणार आहेत त्या ठिकाणी मोठया प्रमाणात रस्त्याच्या डागडुजीची कामे करण्यात आली असून स्वच्छतेसाठी स्थानिक प्रशासनाकडून मोठया प्रमाणात खर्च करण्यात आला आहे. कोल्हापूर येथील हातकणंगले लोकसभा मतदारसंघातील उमेदवाराच्या प्रचारासाठी मोदी येणार असल्याने विमानतळापासून ◀◀ पान २ वर

## माधवी राजे सिंधिया यांचे निधन

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**ग्वाल्हेर राजघराण्याच्या राणी आणि केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांच्या आई माधवी राजे सिंधिया यांचे आज बुधवारी सकाळी निधन झाले. त्या ७० वर्षांच्या होत्या. १५ फेब्रुवारी रोजी त्यांना एम्समध्ये दाखल करण्यात आले होते आणि तेव्हापासून त्यांची प्रकृती खालावली होती.**



माधवीराजे यांनी बुधवारी सकाळी ९.२८ वाजता अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही दिवसांपासून माधवीराजे व्हेंटिलेटरवर होत्या. १५ फेब्रुवारी रोजी त्यांना एम्समध्ये दाखल करण्यात आले होते. त्यांना सेप्सिससह न्यूमोनिया झाला होता. ज्योतिरादित्य सिंधिया हे गुना-शिवपुरी लोकसभा मतदारसंघातून भाजपचे उमेदवार आहेत, जेथे ७ मे रोजी मतदान झाले होते. निवडणूक प्रचारादरम्यानही सिंधिया सातत्याने दिल्लीला भेट देत होते. ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१५ मे २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ४०.०० क्विंटल | २,२६१ | ३,१०१ | २,५३५ |
| ज्वारी/हायब्रिड : ६०.०० क्विंटल | २,००० | २,७७१ | २,३७४ |
| मूग : ०.५० क्विंटल | ९,८५० | ९,८५० | ९,८५० |
| तूर : १.५० क्विंटल | १०,३०० | ११,२९० | १०,८३० |
| उडीद : ५.५० क्विंटल | ७,९०० | ७,९०१ | ७,९०० |
| बाजरी: ९५.५० क्विंटल | १,७०० | २,८५१ | २,४४२ |
| चिंच/लोकल: १०.०० क्विंटल | ६,५०० | ६,५०० | ६,५०० |
| सोयाबीन: २७.०० क्विंटल | २,२०० | २,५७२ | २,३८७ |
| हरभरा: १.०० क्विंटल | ५,७६० | ५,७६० | ५,७६० |

# सीएए अंतर्गत १४ जणांना भारतीय नागरिकत्व बहाल

## » भाजपाची नौटंकी, विरोधकांची टीका

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**केंद्रीय गृह मंत्रालयाने नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए) अंतर्गत १४ जणांना नागरिकत्व बहाल करण्यात आले. नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या पहिल्या संचा अंतर्गत, केंद्र सरकारने १४ लोकांना भारतीय नागरिकत्व प्रमाणपत्रे प्रदान केली आहेत. केंद्रीय गृहसचिव अजय कुमार भल्ला यांनी नवी दिल्लीत पहिल्या १४ लोकांना सीएए अंतर्गत नागरिकत्व प्रमाणपत्रे सुपूर्द केली. याला विरोधकांकडून भाजपाची नौटंकी असल्याचे म्हटले जात आहे.**

### सीएए कायद्यान्वये नागरिकत्व मिळण्याच्या अटी?

» ३१ डिसेंबर २०१४ रोजी किंवा त्यापूर्वी भारतात आलेल्या बांगलादेश, पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील बिगर मुस्लिम स्थलांतरितांना भारतीय नागरिकत्व मिळण्यासाठी लागू करण्यात आला होता. नागरिकत्व कायदा नैसर्गिकीकरणाद्वारे नागरिकत्व प्रदान करतो. अर्जदाराने गेल्या १२ महिन्यांत आणि गेल्या १४ वर्षांपैकी ११ महिने भारतात वास्तव्य केलेले असावे. हा कायदा सहा धर्म (हिंदू, शीख, जैन, बौद्ध, पारशी आणि ख्रिश्चन) आणि तीन देश (अफगाणिस्तान, बांगलादेश आणि पाकिस्तान) मधील भारतात वास्तव्यास असणार्या नागरिकांसाठी आहे. कोणत्याही नियमाचे उल्लंघन झाल्यास ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया (ओसीआय) कार्डधारकांची नोंदणी रद्द केली जाऊ शकते, अशी तरतूद कायद्यात आहे.



नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए) अंतर्गत नागरिकत्व प्रमाणपत्रांचा पहिला संच जारी करण्यात आला आहे. केंद्र सरकारकडून १४ जणांना नागरिकत्व प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. नागरिकत्व प्रमाणपत्र जारी केल्यानंतर, पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि बांगलादेशातून छळ झालेल्या गैर-मुस्लिम स्थलांतरितांना भारतीय नागरिकत्व देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. केंद्रीय गृह सचिव अजय कुमार भल्ला यांनी नियुक्त पोर्टलद्वारे १४ लोकांच्या अर्जांवर ऑनलाइन प्रक्रिया केल्यानंतर त्यांना भारतीय नागरिकत्व प्रमाणपत्रे सुपूर्द केली आहेत. दरम्यान, बांगलादेश, ◀◀ पान २ वर

### बिगर मुस्लिम निर्वासितांना मिळणार भारतीय नागरिकत्व

» नागरिकत्व (सुधारणा) विधेयक २०१९ मध्ये संसदेने मंजूर केले. नंतर या विधेयकाला राष्ट्रपतींची मंजुरी मिळाली. नागरिकत्व सुधारणा कायदा ११ मार्च २०२४ रोजी देशात लागू झाला. या कायद्यामुळे पाकिस्तान, बांगलादेश आणि अफगाणिस्तानमधील हिंदू, शीख, जैन, बौद्ध, पारशी आणि ख्रिश्चन समुदायातील अल्पसंख्याकांना भारतीय नागरिकत्व मिळणे सोपे होणार आहे.

cmyk

अग्रलेख

# पाक मधील उद्रेक आणि भारत

पाकिस्तानचा आदर करा, त्यांच्याकडे अणुबॉम्ब आहे, अशा आशयाचे वक्तव्य असणारी काँग्रेस नेते मणिशंकर अय्यर यांची चित्रफीत प्रचाराच्या रणधुमाळीत व्हायरल करण्यात आली आणि त्यावरून पंतप्रधान मोदींसह सत्ताधारी भाजपने काँग्रेसवर भडिमार सुरू केला आहे. या मुद्याबरोबरच ओघाने पाकव्याप्त काश्मीरचा (पीओके) मुद्दाही प्रचाराच्या केंद्रस्थानी आला आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी 'पाकव्याप्त काश्मीर भारतात येण्यासाठी युद्ध करण्याची गरजच पडणार नाही,' असा दावा केला आहे, तर परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी 'एक दिवस पाकव्याप्त काश्मीरवरचा पाकिस्तानचा बेकायदा ताबा संपुष्टात येईल आणि तो भाग पुन्हा भारताशी जोडला जाईल,' असा दावा केला आहे. पंतप्रधान व गृहमंत्री तर प्रत्येक जाहीर सभेत व मुलाखतीत पाकव्याप्त काश्मीर भारताचाच भाग आहे व तो आम्ही परत घेणारच अशा गर्जना नित्यनेमाने करत असतात. मूळ मुद्दा हा की, इकडे भारतात पाकिस्तान व पाकव्याप्त काश्मीर हा मुद्दा प्रचाराच्या केंद्रस्थानी आलेला असताना तिकडे पाकव्याप्त काश्मीरमधील जनतेचा पाकिस्तान सरकारविरुद्धच्या भावनांचा प्रचंड उद्रेक झालेला आहे.

महागाई, विजेचा तुटवडा, मूलभूत सोयीसुविधांचा अभाव यामुळे जनतेत असंतोष उफाळून आला आहे. अर्थात आज पाकिस्तान ज्या आर्थिक दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर उभा आहे त्यातून केवळ पाकव्याप्त काश्मीरमध्येच नव्हे तर संपूर्ण पाकिस्तानातील जनतेत हा असंतोष खदखदतो आहे. मात्र, पाकव्याप्त काश्मीरमध्ये या असंतोषाला या भागातील जनतेला पाकिस्तानकडून सतत दुय्यम वागणूक दिली जात असल्याच्या भावनेची जोड मिळाली आहे. पाकिस्तान सरकारच्या या दुजाभावाच्या वागणुकीला कंटाळून पाकव्याप्त काश्मीरमधील जनता आता पाकिस्तानापासून आम्हाला स्वातंत्र्य हवे असल्याची मागणी करते आहे. पाकव्याप्त काश्मीरमधील शहरेच नव्हे तर छोटी छोटी गावेही पाकिस्तान सरकारविरोधात पेटून उठली आहेत. गेल्या दीड वर्षात पाकव्याप्त काश्मीरमध्ये पाकिस्तान सरकारविरुद्ध उग्र आंदोलन होण्याची ही तिसरी-चौथी वेळ आहे. पाकव्याप्त काश्मीरमधील जनतेचा पाक लष्करावर सर्वांत जास्त राग आहे. 'ये जो दहशतगर्दी है उसके पीछे वर्दी है,' या तरुण आंदोलकांच्या घोषणांमधून हा राग मोठ्या प्रमाणावर व्यक्त होतो आहे. गेल्या काही दिवसांत पाक लष्कराने केलेल्या कारवाईत शेकडो आंदोलक जखमी झाले आहेत. अनेक जण मरण पावले आहेत. मात्र, मृतांचा खरा आकडा अर्थातच कुणाला माहिती नाही. ताज्या आंदोलनात पाक लष्कराच्या या दहशतीविरुद्धचा संताप उफाळून आलेला पाहायला मिळतो आहे. अशा परिस्थितीत पाकव्याप्त काश्मीर भारताचेच, असा कायम दावा करणाऱ्या भारतातील मोदी सरकारची प्रत्यक्ष भूमिका काय? असा प्रश्न निर्माण होतो. पाकव्याप्त काश्मीरच्या दक्षिणेकडील मुझफ्फराबाद, मीरपूर, भिंबर, कोटली, बाग, नीलम, रावळकोट आणि सुधानोती अशा दहा जिल्ह्यांतील जनता सध्या रस्त्यावर उतरलेली आहे. अवामी ॲक्शन कमिटीने बेमुदत चक्काजाम व कडकडीत बंदचे आवाहन केल्यापासून राजधानी मुझफ्फराबादसह बहुतेक सगळ्या मोठ्या शहरांमधील जनजीवन ठप्प झाले आहे. पाकव्याप्त काश्मिरातील या आंदोलनाची धग उत्तरोत्तर वाढत चालली आहे. दक्षता म्हणून शाळा-महाविद्यालये, शासकीय कार्यालये बंद ठेवण्यात आली आहेत. सेहनसा, मिरपूर, खुईरट्टा, हतियान वगैरे ठिकाणी आंदोलकांना काबूत ठेवण्यासाठी पाकिस्तानी रेंजर्सनी लाठीहल्ले केले, अश्रुधुराचा वापर केला. यात शेकडो आंदोलक जखमी झाले आहेत. पाकव्याप्त काश्मीरच्या स्वायत्त सरकारने जनतेचा हा उद्रेक पाहून पाक सरकारकडे जास्तीची लष्करी कुमक मागितली आहे. याचाच अर्थ हा की, हे आंदोलन लवकर शमणार नाही, हे पाकव्याप्त काश्मीरच्या स्वायत्त सरकारला कळून चुकले आहे. पाक सरकार आंदोलकांना चर्चेतून मार्ग काढण्याचे आवाहन करत असले तरी आंदोलक पाकिस्तानपासून स्वातंत्र्याच्या आपल्या मागणीवर ठाम आहेत. पाकव्याप्त काश्मीरच्या जनतेला भारताने मदत करावी अशा आशयाचे बॅनर्स आंदोलकांनी झळकावले आहेत. अनेक नेत्यांनी पाकिस्तानच्या जुलमी राजवटीतून भारताने आम्हाला बाहेर काढावे, अशी जाहीर मागणी केली आहे. पाकव्याप्त काश्मीरचे परागंदा नेते अमजद अयुब मिर्झा वारंवार भारताला साद घालत आहेत. ताज्या व्हीडीओत त्यांनी 'आता वेळ टळून चालली आहे. पाकव्याप्त काश्मीर आणि गिलगिट-बाल्टिस्तानला भारताने पाकच्या जोखडातून लवकरात लवकर मुक्त करावे,' असे आवाहन केले आहे. तर याआधीच्या व्हीडीओत त्यांनी थेट आम्हाला भारतात विलीन व्हायचे असल्याचे म्हटले होते. अशा सगळ्या स्थितीत आता भारत काय भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पाकिस्तानपासून बांगलादेशला मुक्ती मिळवून देण्याच्या इतिहासाची भारत पुनरावृत्ती करणार का? की, पाकव्याप्त काश्मीरवरचा आपला दावा खरा करून हा भाग भारतात विलीन करून घेण्याचा प्रयत्न भारत करणार? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

## रोटरी क्लबच्या वतीने मतदारांना वृक्षांचे वाटप

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**शहरात वृक्ष चळवळ जोपासली जावी. वृक्ष लागवडीच्या माध्यमातून निसर्गाचा समतोल राखण्यासाठी सोमवारी दिवसभर श्री.खोलेश्वर विद्यालया समोर रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या वतीने ४०० विविध प्रकारच्या रोपटच्याचे वाटप मतदान करण्यासाठी येणाऱ्या कुटुंबांना वाटप करण्यात आले.**




अंबाजोगाई शहरातील या वर्षी नवीन १० हजार वृक्ष लागवडीचा संकल्प रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी च्या वतीने करण्यात आला. मतदानाच्या पार्श्वभूमीवर सोमवारी दिवसभर खोलेश्वर विद्यालयाच्या प्रवेशद्वारा समोर हा उपक्रम राबविला. शहरातील ४०० कुटुंबांना वृक्षांचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी अनेक राजकीय व सामाजिक कार्यकर्ते यांनाही वृक्षरोप भेट म्हणून देण्यात आले. या उपक्रमासाठी रोटरीचे अध्यक्ष स्वप्नील परदेशी,सचिव गणेश राऊत, कल्याण काळे, धनराज सोळंकी,डॉ.बालासाहेब लोमटे, प्रा.संतोष मोहिते,प्रदीप झरकर, ॲड अनिल लोमटे, यांच्यासह रोटरी चे सदस्य व मान्यवर उपस्थित होते.

## बोरगाव येथील हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची गुरूवारी सांगता



**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील बोरगाव बुद्रुक येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची गुरूवार १६मे रोजी बारामती येथील कन्हेरी संस्थानचे लक्ष्मण महाराज कोकाटे यांच्या सकाळी ९ ते ११ वाजताच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार आहे.केज तालुक्यातील बोरगाव बुद्रुक येथे परमहंस परिव्राजकाचार्य सदगुरू आनंदश्रमस्वामी महाराज ,व वेदशास्त्र संपन्न गणेश्वरशास्त्री द्रवीड वाराणसी यांच्या कृपाशिर्वादाने वै.लक्ष्मण काका क्षीरसागर यांच्या पुण्यतिथी सोहळ्या निमित्त गुरूवार ९ मे पासून अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास सुरूवात झाली.आज बुधवार १५ मे रोजी महादेव मळी येथील महंत बबन महाराज मस्के यांचे ९ ते ११ या वेळेत हरीकीर्तन होणार आहे. गुरूवार १६मे रोजीबारामती येथील कन्हेरी संस्थानचे लक्ष्मण महाराज कोकाटे यांच्या सकाळी ९ ते ११ वाजताच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार आहे.

**लक्ष्मण महाराज कोकाटे यांचे गुरूवारी काल्याचे कीर्तन**

### ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

बोरगाव बुद्रुक येथील मारोती मंदिरात मागील सात दिवसांपासून आळंदी येथील पांडूरंग महाराज क्षीरसागर, दत्तात्रय महाराज बडगे यांच्या नेतृत्वाखाली ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास सुरूवात झालेली आहे.सकाळी ७ ते ११ या वेळेत ज्ञानेश्वरी पारायण सोहळा सुरू असुन गावातील विद्यार्थ्यांनी या सोहळ्यात सहभाग घेतला आहे.

## भेल संकुलातील सी.बी.एस.ई विद्यार्थ्यांचे दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

**येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई द्वारा संचलित भेल संस्कार केंद्रातील सी.बी.एस.ई.च्या विद्यार्थ्यांनी इ स २०२३ - २४ मध्ये इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. गुणवंत विद्यार्थ्यावर शुभेच्छांचा वर्षाव सुरू आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भेल संस्कार केंद्राने आपली १००% निकाल देण्याची परंपरा कायम राखली आहे. या परीक्षेत एकूण ७९ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते, त्यापैकी सर्वच्या सर्व विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.**

त्याचप्रमाणे संकुलातील विद्यार्थिनी कु. अनुष्का जगन्नाथ मुंडे हिने ९६.४०% गुण मिळवत संकुलात प्रथम क्रमांक पटकावला आहे. संकुलातील सर्वच विद्यार्थ्यांनी चांगली कामगिरी केली असून चि. पियुष अभिजीत गडगूळ आणि चि. अमर वैजनाथ मुंडे यांनीही ९५.८०% गुण मिळवत द्वितीय क्रमांक पटकावला आहे, तर चि. सुजल शांतिनाथ शिंदे याने ९५.२०% गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला आहे. संकुलातील १३ विद्यार्थ्यांना ९०% पेक्षा अधिक गुण असून ५६ विद्यार्थ्यांनी डिस्टिंक्शन मिळवले आहे तर १० विद्यार्थी हे प्रथम श्रेणीच्या खाली आहेत. यानिमित्त संकुलाचे श्री. जुगल किशोर लोहिया (अध्यक्ष, स्थानिक समन्वय समिती) श्री. अमोल डुबे (अध्यक्ष, शालेय समिती) श्री. जीवनराव गडगूळ (सदस्य) श्री. राजेश्वर देशमुख (सदस्य) इ.नी ही संकुलातील या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या. तसेच भेल संकुलाचे एका लहानशा रोपट्यापासून महावटवृक्षात रूपांतर करण्यासाठी अपार मेहनत घेणारे श्री. वसंतराव देशमुख(अण्णा) श्री.विकासराव डुबे (दादा)डॉ. श्री. सतीश रायते, सौ. शोभा भंडारी (माजी प्राचार्या, सदस्य) यांनीही या विद्यार्थ्यांना आशीर्वादरुपी शुभेच्छा दिल्या. तसेच संकुलाचे प्राचार्य श्री. गिरीश ठाकूर यांनीही या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देऊन त्या सर्वांना एलकेजी ते दहावीपर्यंत अध्यापनाचे कार्य करून घडविणाऱ्या संकुलातील सर्व शिक्षक- शिक्षिकांचे मनःपूर्वक अभिनंदन व आभारही व्यक्त केले. याप्रसंगी संकुलातील सर्व विभाग प्रमुख, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी इ.नीही या सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या अशी माहिती भेल संकुलाचे प्रसिद्धी प्रमुख श्री. प्रफुल्ल कांबळे यांनी प्रसिद्धी माध्यमास दिली.

## जि.प.उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत महात्मा बसवेश्वर जयंती साजरी

**केज । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी केंद्र लव्हुरी ता.केज या शाळेत महात्मा बसवेश्वर जयंती साजरी करण्यात आली.या शाळेचे मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ कदम व बाळासाहेब राठोड यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुजन करुन अभिवादन केले.महात्मा बसवेश्वर हे बाराव्या शतकातील वीरशैव लिंगायत संप्रदायाचे प्रसारक धर्मगुरू असून कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर - बागेवाडी गावात ११३३ साली अक्षयतृतीया या दिवशी महात्मा




बसवेश्वर यांचा जन्म झाला. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी केंद्र लव्हुरी ता.केज या शाळेतमहात्मा बसवेश्वर जयंती अक्षय तृतीया दिवशी दि.१० मे २०२४ शुक्रवार रोजी साजरी करण्यात आली.यावेळी शिक्षकवृंद व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थीत होते.



## वादळी वाऱ्याने गोठ्यावर झाड उन्मळून पडले ; शेतकऱ्यांचे नुकसान

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील विविध गावामध्ये वादळी वारा सुटल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले.आनंदगाव शिवारात गुरुवार रोजी सायंकाळच्या सुमारास जोराचा वादळवारा सुटला यामध्ये झाड गोठ्यावर पडल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले.श्रीकांत ब्रह्मदेव गायकवाड यांच्या शेतातील गोठ्यावर आंब्याचे झाड उन्म्हळून पडले त्यामुळे गोठ्याचे मोठे नुकसान झाले आहे. तर गोठ्यात असलेली जनावरे जखमी झाले आहेत.वादळी वाऱ्यात झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.जोराच्या वादळी वाऱ्यामुळे तालुक्यातील अनेक भागांमध्ये आंबा पिकाचे मोठे नुकसान झाले आहे.नुकसानग्रस्त भागाचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी केली जात आहे.

## उंदरी येथे स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

**केज । प्रतिनिधी**

उंदरी येथे स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सर्व प्रथम ध्वजारोहन करून प्रतिमा पूजन करण्यात आले.त्यानंतर जिजाऊ वंदना घेण्यात आली.यावेळी छावा संघटनेचे जिल्हा प्रमुख शिवाजी दादा ठोंबरे, छत्रभुज ठोंबरे, बाबासाहेब ठोंबरे,शंकर गरडे, दिनेश ठोंबरे, विष्णू ठोंबरे,यश ठोंबरे, अशोक ठोंबरेगुरुजी संदीप ठोंबरे, बापू ठोंबरे, मधुकर ठोके,गजू ठोंबरे, भारत आबा



ठोंबरे, केशव ठोंबरे,प्रमोद ठोंबरे, अशोक ठोंबरे, संपत लोखंडे, महेश पतंगे, दिलीप ठोंबरे, बापू गरडे, समाधान ठोंबरे, विश्वास ठोंबरे, अशोकठोके व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १वरून...

### टोमॅटोची लाली

तर दिल्लीत ८०० रुपयापर्यंतचा दर मिळत आहे. दर घसरल्याचा फायदा ग्राहकांना होत आहे. मात्र, याचा शेतकऱ्यांना फटका बसत आहे. दिल्लीच्या बाजारात हिमाचल प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, हरियाणा आणि पंजाबमधून मोठ्या प्रमाणात टोमॅटोची आवक वाढली आहे. त्यामुळे दिल्लीमध्ये टोमॅटोच्या दरात ४० टक्क्यांची घसरण झाली आहे. टोमॅटो असोसिएशनने दिलेल्या माहितीनुसार, राजस्थानसारख्या राज्यातून टोमॅटोची आवक चांगली झाली आहे. याशिवाय उत्तर प्रदेश, हरियाणा आणि पंजाबमध्येही किमतीत मोठी घसरण नोंदवण्यात आली आहे. गुणवत्तेनुसार, दिल्ली, उत्तर प्रदेशसह इतर घाऊक बाजारात टोमॅटोचे घाऊक दर सुमारे ५ ते १५ रुपये प्रतिकिलो आहेत. या मिळणाऱ्या दरात शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च देखील निघत नाही. त्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत.

----------

### ७० हजार कोटींचा उपमुख्यमंत्री,

म्हणाले. मोदीजी मी तुम्हाला माझं बर्थसर्टिफेक तुमच्याकडे मागितलं नाही, तेवढी तुमची लायकीही नाही. तुम्ही कुणी ब्रम्हदेवाचा अवतारही नाहीत, असं उद्धव ठाकरेंनी म्हटले आहे. उद्धव ठाकरे पुढे म्हणाले, आज तुम्ही माझं सगळं चोरलंत ना? चोराच्या हातात धनुष्यबाण दिलं पण, मशाल बघा कशी पेटलेली आहे. त्यांना प्रश्न पडला आहे, संपूर्ण देशाची फौज मोदींकडे आहे, तरी सुद्धा उद्धव ठाकरेंना ते घाबरतात, कारण तुमच्या रुपाने शिवसेनाप्रमुखांचे आणि माझ्या माँचं माझ्या भोवती जे कवच आहे. ते मोदी तुम्ही काय, तुमच्या कित्येक पिढ्या, मी राजकारणाचे बोलतोय वैयक्तिक नाही, कारण राजकारणात भाजपला पोरंच होत नाहीत. म्हणून त्यांना नकली संतान, आपल्याकडचे गद्दार मांडीवर घ्यावे लागले आहेत, असंही ठाकरेंनी म्हटले आहे.

-------------

### प्रधानमंत्री नरेंद्र मोदी विरोधात

आणि लासलगाव शहर विकास आघाडीच्या अशा एकूण वीस जणांना आतापर्यंत लासलगाव पोलिसांनी नोटिसा बजावल्या आहेत.

-------------

### गर्भवतींना पोस्टल बॅलेटद्वारे मतदान

उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश धीरज सिंह ठाकूर आणि न्यायमूर्ती आर रघुनंदन राव यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. संबंधित याचिका ही एक प्रतिनिधित्व म्हणून पाहावी. गर्भवती महिलांना पोस्टाद्वारे मतदान करण्याची परवानगी देण्याबाबत निवडणूक आयोगाने विचार करावा, अशी सूचना देत खंडपीठाने ही याचिका निकाली काढली.

----------

### विदर्भ, मराठवाड्यात पावसाचा अंदाज

आणि विदर्भातील काही ठिकाणी विजा आणि मेघगर्जनेसह वादळी पावसाचाही अंदाज हवामान विभागाने दिला. शुक्रवारी कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यात तर मध्य महाराष्ट्रातील कोल्हापूर, सातारा आणि पुणे तसेच नगर, सोलापूर आणि सांगली जिल्ह्यातही वादळी पावसाचा अंदाज आहे. मराठवाडा आणि विदर्भातील काही भागातही वादळी पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला.

------------

### माधवी राजे

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्या आई राजमाता माधवी राजे सिंधिया या मूळच्या नेपाळच्या होत्या. त्या नेपाळच्या राजघराण्याशी संबंधित होत्या. त्यांचे आजोबा जुद्द समशेर बहादूर नेपाळचे पंतप्रधान होते. १९६६ मध्ये माधवराव सिंधिया यांच्याशी माधवी राजे यांचा विवाह झाला होता. दरम्यान, श्वास घेण्यास त्रास होत असल्याने माधवी राजे यांना १५ फेब्रुवारी रोजी दिल्लीतील एम्समध्ये दाखल करण्यात आले होते. तेव्हापासून त्या लाईफ सपोर्ट सिस्टीमवर (व्हेंटिलेटर) होत्या. गुना येथील निवडणूक प्रचारादरम्यान राजमाता आजारी असल्याची माहिती खुद्द ज्योतिरादित्य यांनीच दिली होती.

----------

### नरेंद्र मोदींच्या सभेसाठी

ते सभेच्या ठिकाणापर्यंतच्या रस्त्याची डागडूजी व स्वच्छतेची कामे कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत करण्यात आल्याचा मुद्दाही निवडणूक आयोगाच्या निदर्शनास त्यांनी आणून दिला. पुढे आपल्या पत्रात अंबादास दानवे म्हणाले की, वास्तविक पाहता इतर वेळी देशाचे पंतप्रधान किंवा इतर राजकीय महत्वाच्या पदावर असलेल्या व्यक्तींच्या दौऱ्याच्यावेळी अशी कामे करण्यात येत असतात. परंतु लोकसभेच्या निवडणुकीसाठी देशात आदर्श आचारसंहिता सुरु असताना नरेंद्र मोदी यांच्या बैठकांच्या स्थळी जाण्यासाठी प्रत्येक ठिकाणी अशी कामे शासकीय यंत्रणेचा वापर करुन करण्यात येत असल्याने एक प्रकारे हा निवडणूक आयोगाने जाहिर केलेल्या आदर्श आचारसंहितेचा भंग आहे. त्यामुळे यातील दोषींवर कारवाई करण्याची मागणी दानवे यांनी केली आहे.

----------

### सीएए अंतर्गत १४ जणांना भारतीय

पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील छळ झालेल्या गैर-मुस्लिम स्थलांतरितांना भारतीय नागरिकत्व देण्यासाठी डिसेंबर २०१९ मध्ये नागरिकत्व सुधारणा कायदा करण्यात आला होता. यामध्ये हिंदू, शीख, जैन, बौद्ध, पारशी आणि ख्रिश्चन धर्मियांचा समावेश आहे. कायदा झाल्यानंतर त्याला राष्ट्रपतींची संमती मिळाली होती. परंतु ज्या नियमांनुसार भारतीय नागरिकत्व दिले जाणार आहे, ते नियम चार वर्षांपेक्षा जास्त विलंबानंतर या वर्षी ११ मार्च २०२४ रोजी जारी करण्यात आले. त्यानंतर आता १४ जणांना भारतीय नागरिकत्व बहाल करण्यात आले आहे.

-----------

### एक कोटींची लाच : बीडच्या आर्थिक

सहकार्य करण्यासाठी तब्बल १ कोटी रुपयांच्या लाचेची मागणी आर्थिक गुन्हे शाखेकडून करण्यात आली होती. या बाबतची तक्रार बीड एसीबीकडे आली होती. तडजोडीअंती ३० लाख रूपये देण्याचे ठरले होते. यापैकी पहिल्या टप्प्यात दहा लाख देण्यात येणार होते, त्यानुसार या दहा लाखापैकी पाच लाख रूपये स्विकारताना बीडमधील एका खासगी व्यक्तीला रंगेहाथ पकडण्यात आले. याप्रकरणी बीड एसीबीने आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक हरिभाऊ खाडे, हे. कॉ. जाधवर आणि कुशाल प्रविण जैन या तिघांवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया हाती घेतली आहे. बीड एसीबीने बीडमध्ये केलेल्या या कारवाईमुळे जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि.१६ मे २०२४ ३

## श्री.संत ज्ञानेश्वर पब्लिक स्कूलची सायली वीर सी.बी.एस.ई.दहावी बोर्डात शाळेतून प्रथम



बीड : सी.बी.एस.ई दहावी बोर्डाचा निकाल दि.१३ मे २०२४ वार सोमवार रोजी दुपारी घोषित झाला.यामध्ये ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल,बीड चा शंभर (१००%) टक्के निकाल लागला आहे.सी.बी.एस. ई.दहावी बोर्ड परीक्षेत सायली सदानंद वीर ९५% घेऊन शाळेतून प्रथम क्रमांक मिळवला.श्री.संत ज्ञानेश्वर इंग्लिश पब्लिक स्कूलच्या शिक्षक वर्गाचे व सायली च्या आई,वडिलाचे मार्गदर्शन मोलाचे ठरले असून सायलीच्या अभ्यास करण्याच्या पद्धत व परिश्रम,शिक्षणाची आवड मोलाचे ठरले आहे. तसेच हर्षल लक्ष्मण कोलगुडे ९४.४%, तनिष विशाल धांडे ९३.२%, चैतन्य अंकुश घोलप ८७.८%, नीदा ग फार शेख ८७.६%, टक्के मार्क मिळवले आहे. ९ ०% च्या वरती ०३ तर ८०% टक्के च्या वरती १४, ७०% टक्के च्या वर १२,६०% टक्के ची कायम ठेवली आहे. संस्थेच्या संचालकांनी वेळोवेळी मार्गदर्शनामुळेच हे सर्व शक्य झालं आहे.या शाळेची परंपरा कायम राखन्यात यश मिळाले आहे. १० वी बोर्डमधील सर्व विद्यार्थ्यांचे पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देऊन स्वागत करण्यात आले. सायली वीर ला मिळालेल्या जिद्द व यशाबद्दल शिक्षकवर्गतून,आईवडील,नातेवाईक सर्वच स्तरातून,माध्यमातून सत्कार करून पेढे भरवण्यात आले व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# वनराई संस्थेच्या वतीने पाणलोट व्यवस्थापनाची कामे सुरू

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील शेरी येथे वनराई संस्थेच्या वतीने पाणलोट व्यवस्थापनाची कामे सुरू आहेत. या गावामधील भूजल पातळीत वाढ होण्यासाठी पाझर तलाव खोलीकरण, माळरानावर पावसाचे पाणी जमिनीत जिरण्यासाठी समतल चर खोदून पाणी पातळी वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. निस्वार्थ भावनेने सुरू असलेल्या या कामाबद्दल ग्रामस्थांच्या वतीने वनराई संस्थेचे अध्यक्ष रवींद्र धारिया यांचे स्वागत करण्यात आले आहे. वनराई व एल अ‍ॅण्ड टी. टेक्नॉलॉजी सर्व्हिसेसच्या माध्यमातून शेरी येथे नवीन बंधाऱ्याचे भूमिपूजन करण्यात आले आहे. तसेच गावाचा विकास होण्यासाठी व शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी पीकपाण्यासाठी



पावसाळा संपल्यानंतर दुष्काळग्रस्त परिस्थितीत शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी काम सुरू आहे. तसेच मृदा जल-वन संवर्धनासाठी वनीकरण, वृक्ष लागवड माजी मंत्री मोहन धारिया यांचे स्वप्न होते. वनराई संस्थेचे अध्यक्ष काम सुरु आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. मोहन धारिया यांचे स्वप्न असलेले गावातील पाणी गावात आणि शिवारातील पाणी शिवारात हा कार्यक्रम राबविला जात आहे. यावेळी सरपंच संदीप खाकाळ, वनराईचे विश्वस्त सागर धारिया, मंगेश काळे, आकाश शेडगे, ज्ञानेश्वर सरडे, योगेश मिरपागर, दीपक सोनवणे, नवनाथ वाघुले, राजू रासकर, प्रदीप बांदल, श्रीराम सोनवणे, तात्या सोनवणे, दादा सोनवणे उपस्थित होते. करणे, वृक्षतोडीला आळा घालणे, वन संवर्धन विषयी जनजागृती करणे असे उपक्रम सुद्धा राबवले जात आहेत. दरम्यान, या बंधाऱ्यांमुळे शेतीच्या सिंचनासाठी याचा लाभ शेतकऱ्यांना होणार आहे.

## श्री.संत ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल सायली वीर सी.बी.एस.ई.दहावी बोर्डात शाळेतून प्रथम

**बीड । प्रतिनिधी**

**सी.बी.एस.ई दहावी बोर्डाचा निकाल दि.१३ मे २०२४ वार सोमवार रोजी दुपारी घोषित झाला.यामध्ये ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल,बीड चा शंभर (१००%) टक्के निकाल लागला आहे.सी.बी.एस. ई.दहावी बोर्ड परीक्षेत सायली सदानंद वीर ९५% घेऊन शाळेतून प्रथम क्रमांक मिळवला.श्री.संत ज्ञानेश्वर इंग्लिश पब्लिक स्कूलच्या शिक्षक वर्गाचे व सायली च्या आई,वडिलाचे मार्गदर्शन मोलाचे ठरले असून सायलीच्या अभ्यास करण्याच्या पद्धत व परिश्रम,शिक्षणाची आवड मोलाचे ठरले आहे.**

तसेच हर्षल लक्ष्मण कोलगुडे ९४.४%, तनिष विशाल धांडे ९३.२%,



चैतन्य अंकुश घोलप ८७.८%, नीदा ग फार शेख ८७.६%, टक्के मार्क मिळवले आहे. ९ ०% च्या वरती ०३ तर ८०% टक्के च्या वरती १४, ७०% टक्के च्या वर १२,६०% टक्के ची कायम ठेवली आहे. संस्थेच्या संचालकांनी वेळोवेळी मार्गदर्शनामुळेच हे सर्व शक्य झालं आहे.या शाळेची परंपरा कायम राखन्यात यश मिळाले आहे. १० वी बोर्डमधील सर्व विद्यार्थ्यांचे पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देऊन स्वागत करण्यात आले. सायली वीर ला मिळालेल्या जिद्द व यशाबद्दल शिक्षकवर्गतून,आईवडील,नातेवाईक सर्वच स्तरातून,माध्यमातून सत्कार करून पेढे भरवण्यात आले व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

## वैभवी फडचे दहावी सीबीएसई परीक्षेत घवघवीत यश

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यातील नामांकित डॉ . प्रदीप फड यांची कन्या सिल्पा हिने इयत्ता १० सीबीएसई बोर्ड परीक्षेत यश संपादन करून तिने ९४.६० एवढी टक्केवारी प्राप्त केलेली आहे. वैभवी हिचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.



अंबाजोगाई तालुक्यातील मौजे मूर्ती येथील डॉ प्रदीप फड बर्दापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी म्हणून सेवेत आहेत. त्यांची कन्या वैभवी ही न्यु व्हिजन पब्लिक स्कूल अंबाजोगाई येथे इयत्ता १० वीच्या वर्गात शिकत होती. नुकताच सीबीएसई परीक्षेचा निकाल जाहिर झाला असून या परीक्षेत सिल्पा हिने ९४.६० एवढे टक्के गुण घेऊन गुणवत्ता यादीत आली आहे. वैभवी हिच्या यशाबद्दल , डॉ तात्याराव लहाने, डॉ. नवनाथ घुगे, , डॉ नाथराव फड, पत्रकार वसुदेव शिंदे, संपादक परमेश्वर गित्ते, पत्रकार ज्योतिबा जाधव यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी वैभवी हिचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

# माजलगाव धरणाचे पाणी नदीपात्रात सोडण्याची मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

प्यायला पाणी नाही, जनावरांना पाण्याची अडचण, ऊस वाळत असल्याने शेतकरी मेटाकुटीला आलेला, माजलगाव धरणातून सिंदफणा नदीपात्रात पाणी सोडण्याची कार्यवाही करावी, अशी मागणी माजलगाव तालुक्यातील काही ग्रामस्थांनी करताच पालकमंत्री धनंजय मुंडे यंनी जलसंपदा विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना फोन केल्याने अवघ्या दोन दिवसांतच सिंदफणा नदीपात्रात माजलगाव धरणातून पाणी सोडण्यात आले आहे. माजलगाव तालुक्यातील गावांनी सिंदफणा नदीपात्रात पाणी सोडण्याची मागणी केली होती. पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी




तातडीने सदरील मागणीचा विचार करून माजलगाव धरणातील उपलब्ध जलसाठा त्याचबरोबर धरणातून पुढे जाणाऱ्या रोशनपुरी बंधाऱ्यासह विविध गावांना मिळावयाच्या लाभाचा तातडीने विचार करून माजलगाव धरणातून पुढे पाणी सोडण्याबाबत जलसंपदा विभागाचे सचिव यांच्यासह

अन्य अधिकाऱ्यांना दूरध्वनीवरून सूचना केल्या होत्या. त्यानुसार आचारसंहितेचे पालन करत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पाणी सोडण्याबाबतचा निर्णय घेतला असून शनिवारी सकाळी प्रत्यक्ष पाणी सोडण्यात आले आहे.

ग्रामस्थांना विहिरी, तलावातून आणावे लागते पाणी माजलगाव तालुक्यातील गावांमध्ये सध्या दुष्काळी परिस्थिती असून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. ग्रामस्थांना विहिरी, तलाव, बोअरमधून पाणी आणावे लागत होते. त्याचबरोबर दुष्काळात गुरे जगवण्यासाठी संघर्ष करावा लागत होता. त्याचबरोबर उन्हाळी हंगामातील बाजरी, खरबूज, टरबूज पिके या पिकांना पाण्याचा लाभ होणार आहे. रोशनपुरी, नागडगाव, सांडस चिंचोली, मनूर, लुकेगाव, दिपेगाव आदी गावांतील ग्रामस्थांनी माजलगाव धरणातून सिंदफणा नदीपात्रात पाणी सोडण्यात यावे अशी मागणी सिंदफना नदीकाठच्या लोकांनी आणि शेतकऱ्यांनी केली होती.

## रावसाहेब व रूक्मिणीबाई सानप दाम्पत्यांचे निधन

**बीड । प्रतिनिधी**

खडकवाडी(ता.पाटोदा) येथील जेष्ठ नागरिक रावसाहेब नारायण सानप (वय ८८वर्षे,ह.मु.गजाणन कॉलनी बीड) यांचे १४ मे रोजी वृद्ध काळाने निधन झाले.तर त्यांच्या पत्नी रुक्मिणीबाई रावसाहेब सानप (८२वर्ष)यांचे १० मे रोजी निधन झाले होते.आवघ्या चारच दिवसात आई वडीलांचे निधन झाल्याने सानप कुटुंबीयांवर दुःखाचे डोंगर कोसळला.

बीड शहरातील गजाणन कॉलनीतील रहिवासी आणि मूळ खडकवाडी तालुका पाटोदा येथील जेष्ठ नागरिक नारायण सानप आणि रुक्मिणी बाई रावसाहेब सानप या पती-पत्नीचे चार दिवसाचा फरकाने वृद्ध काळाने निधन झाले. आईच्या निधनानंतर सानप कुटुंबीयांनी तिसऱ्या दिवशी वडीलांना सोबत घेऊन जाऊन १३ मे रोजी खडकवाडी येथील मतदान केंद्रावर मतदानाचे कर्तव्य पार पाडले होते. रावसाहेब आणि रूक्मीनबाई सानप यांच्यावर बीड शहरातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात, सेवानिवृत्त मंडळाधिकारी विठ्ठल सानप, पांडुरंग सानप, आणि पुणे येथील व्यवसायिक डॉ.भास्कर सानप हे तीन मुले, सुभद्रा पुंडलिक पाखरे मुलगी,सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# घाटशीळ पारगावात व्यापाऱ्याला मारहाण

## तुतारीला मतदान का केले म्हणून बेदम मारहाण, दोन आरोपींच्या विरोधात शिरूर पोलिसात गुन्हा

शिरूर कासार । प्रतिनिधी

लोकसभा निवडणूकीच्या मतभेदांचे पडसाद ग्रामीण भागात उमटताना दिसून येत आहेत. दोन्ही गटांकडून मतांची गोळाबेरीज सुरू असतानाच गाव पातळीवर तंट्यांना तोंड फुटू लागल्याने कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. मंगळवारी दि. १४ तालुक्यातील घाटशीळ पारगाव येथे शेळ्या खरेदी करण्यास गेलेल्या व्यापाऱ्यास दोघांनी तु तुतारीस मतदान का केलेस असे म्हणत मारहाण केल्याची घटना घडली आहे शिरूर पोलिसात आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

किरकोळ अपवाद वगळता सोमवारी दि. १३ जल्हाभरात लोकसभा निवडणूकीची मदान प्रक्रिया संपन्न झाली. उमदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले असले तरी गाव पातळीवर मातांच्या गोळाबेरीजेच्या चर्चा रंगल्या आहेत. कोणी कोणास मतदान केले याचे अंदाज बांधले जात असल्याने गावखेड्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होताना दिसून येत आहे. मंगळवारी दि. १४ ब्रम्हणाथ येळंब येथील मतीन भाई शेख व सोहेम मतीन शेख हे घाटशीळ पारगांव येथे शेळ्या खरेदी करण्यासाठी गेले असता अशोक विष्णू खेडकर व महादू आश्रुबा खेडकर रा. घाटशीळ पारगांव यांनी मतीन व सोहेम या बापलेकांना चौकात गाठून तुम्ही तुतरीला का केले ? जरांगे पाटील तुमचा बाप आहे का? असे म्हणत मतिन व सोहेम यांस जातीवाचक शिवीगाळ करत लाथा बुक्यांनी जबर मारहाण जीवे मारण्याची धमकी दिली. मतिन भाई शेख रा. ब्रम्हणाथ येळंब यांच्या फिर्यादीवरून शिरूर कासार पोलिस ठाण्यात रात्री उशीरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सीबीएसई दहावीच्या परीक्षेत अवनी गायकवाडचे यश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील पोदार इंग्लिश स्कूल मध्ये शिकत असलेली अवनी दिलीप गायकवाड हिचा ९८/:टक्के घेऊन प्रथम येणाचा मान तीने पटकवला. अतिशय हुशार असणारी,अभ्यासाबद्दल तळमळ असणारी अवनी हिचे सर्वत तिचे कौतुक होत असून अभिनंदांचा वर्षाव होत आहे.



तिच्या या यशाबद्दल केज उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ डी आर केंद्रे सर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. बालासाहेब लोमटे सर, हाफकिन चे कार्यकारी संचालक डॉ अनंत शिनगारे सर, नगरसेवक श्री संतोष शिनगारे, श्री हेमंत शिनगारे सर, , डॉ.प्रवीण चौधरी पोद्दार इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य कीर्ती कुमार देशमुख सर, डॉ.राहुल माने सर ,श्रीमती संस्कृती गंगणे श्री प्रसेनजित मस्के सर, जेतवन परिवारातील सर्व सदस्य, त्याचबरोबर सर्व डॉक्टर मंडळी शिक्षक प्राध्यापक आदींनी तिचे स्वागत केले.यावेळी अवनीने सांगितले की मलाही मोठेपणी आई-वडिलांप्रमाणे डॉक्टर होऊन रुग्णांची सेवा करायची आहे.

# मोकाट जनावरे ठरतेय डोकेदुखी

**बीड । प्रतिनिधी**

यामध्ये कुत्र्यांची संख्या सर्वाधिक आहे. रात्री रस्त्यावरून जाताना कुठला कुत्रा मागे लागेल याचा नेम नाही. तरी नगर परिषद प्रशासनाने अशा मोकाट कुत्र्यांच्या आणि भरदिवसा मोकाट फिरणाऱ्या प्राण्यांचा बंदोबस्त केला नाही. यामुळे अपघाताच्या प्रमाणात वाढ झाली आहे.

बीड शहरामध्ये मोकाट जनावरांची संख्या वाढली आहे. अशा जनावरांना नियंत्रित करण्यासोबत वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी कोंडवाड्याची यंत्रणा आहे. ही यंत्रणा सध्या कागदावरच आहे. या कोंडवाड्यात पिण्याचे पाणी, चारा आणि स्वच्छता शोधूनही सापडत नाही. गत अनेक दिवसांपासून या कोंडव्याच्यो कुलूपही उघडले नाही. यामुळे मोकाट जनावरांचा हैदौस वाढला आहे. शहरातील प्रत्येक चौकामध्ये मोकाट जनावरे सकाळच्या सुमारास पहायला मिळतात. खास करून भाजीमंडी आणि आठवडी बाजारासह दत्त चौक आणि राज्यमार्गावर या जनावरांचा ठिय्या दिसतो. त्यास भरीस भर म्हणून शहरात मोकाट डुकरांची संख्या वाढली आहे. यातून अस्वच्छतेचे प्रमाण वाढले आहे. या जनावरांसवर नियंत्रण ठेवणारे मालक पुढे येण्यास तयार नाही. यामुळे वाहतुक व्यवस्था विस्कळीत झाली आहे. एखादे मोकाट जनावर जखमी झाले, तर त्याकडे त्याचा मालक ढुकूनही पाहत नाही. पशुधन विभागाच्या यंत्रणेकडे त्याबाबत सुचना केली तर कुठलाही डॉक्टर उपचाराकरिता या ठिकाणी पोहचत नाही. अशा ठिकाणी ग्रामस्थांनाच पुढाकार घ्यावा लागतो. एखादी स्वयंसेवी संस्था पुढे येते. मात्र ज्या यंत्रणेवर याची जबाबदारी आहे, ती यंत्रणा ढुंकूनही पाहत नाही.

# बर्फाचे दर वाढल्याने ऊसाच्या रसाचे दर पाच रुपयांनी वाढले

**बीड । प्रतिनिधी**

शरीराला थंडावा देणाऱ्या उसाचे, लिंबाचे अन्? बर्फाचे दर वाढल्याने रसवंती चालकाला १० रुपये ग्लास देणे परवडत नाही. त्यामुळे उसाच्या रसाचे दर ५ रुपयांची वाढल्याचे रसवंतीचालक सांगतात. यंदा मार्च महिन्यापासूनच कडक उन्हाळा सुरू झाला. आता मे महिना सुरू असून उन्हाचा पारा ४२ अंशांवर पोहोचला आहे. सकाळी ९ वाजताच उन्हाचे चटके सहन होत नसल्याने रस्त्यावर शुकशुकाट दिसत आहे. उन्हापासून बचाव व शरीराला थंडावा मिळावा,



यासाठी शहरातील विविध ठिकाणी रसवंतीचे घुंगरू ऐकायला मिळत आहेत. मात्र, या घुंगराला महागाईचा फटका बसू लागला आहे. रसवंतीसाठी लागणाऱ्या उसाचे, लिंबाचे तसेच बर्फाचे दर वाढल्याने रसवंतीचालकांपुढे संकट उभे राहिले आहे. दोन-तीन वर्षांपूर्वी ऊस ३ हजार रुपये टन मिळत

होता. आता भाव दुप्पट झाले असून, ऊस ६ हजार रुपये टन झाला आहे. लिंबू १५० रुपये किलो दराने मिळत आहेत. तसेच बर्फाचेदेखील भाव वाढल्याने १० रुपयाला ग्लास विकणे परवडत नाही. त्यामुळे एक ग्लास रसामागे ५ रुपये वाढले वाढल्याचे रसवंतीचालक किरण बेदरे, विक्रम गिरी यांनी सांगितले.

## जामखेड येथे मधूरजल प्युअर वॉटरचे उद्घाटन संपन्न



जामखेड । प्रतिनिधी

जामखेड शहरातील मोरे वस्ती येथे आकाश राजेंद्र मराळ यांचे मधुरजल प्युअर वॉटर चे उद्घाटन वडील राजेंद्र मराळ यांचे हस्ते करण्यात आले.

या प्लँटमुळे वस्ती येथील व गावातील लोकांना फिल्टर व शुद्ध पाणी मिळणार आहे.कोरोना काळापासून नागरिक आरोग्याला खूप जपत आहेत.रोजच्या वापरात पिण्याचे शुद्ध पाणी ही आता काळाची गरज ओळखून पिण्याच्या पाण्याबाबत दक्ष राहून शुद्ध पाण्याला प्राधान्य देणे गरजेचे असल्याचे यावेळी आकाश मराळ यांनी सांगितले. यावेळी संतोषशेठ फिरोदिया, विवेकजी कुलकर्णी, गंगासागर खंदारे, सागरशेट अंदुरे, महेश राळेभात,संदीप गायकवाड,उमेश राळेभात ,शिवाजी येवले, किरण मराळ, बालाजी मराळ आदी उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

मा. श्री. ए. एम. फडतरे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७५५/२०२४ अ‍ॅड. आर. आर. शिंदे

अर्जदार : १) राजेंद्र पि. श्रीरंगराव गाडेकर, क्य-५२ वर्षे, धंदा-नौकरी व शेती, पत्ता- विश्वेश्वर नगर, पिपरगव्हाण रोड, बीळ ता. जि. बीड २) अनिल पि. श्रीरंगराव गाडेकर, वय-४७ वर्षे, धंदा-नौकरी व शेती, पत्ता- विश्वेश्वर नगर, पिंपरगव्हाण रोड, बीड ता. जि. बीड ३) सुनिता भ्र. सुनिलराव नांदलगांवकर, वय-५० वर्षे, धंदा-घरकाम, पत्ता - अहिल्या देवी नगर, रविवार पेठ, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई जि. बीड

विरुध्द

गैरअर्जदार :-

अर्जदार हे भारतीय आहेत

**प्रकरण बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे **श्रीरंग रामराव गाडेकर** यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे श्रीरंग रामराव गाडेकर, रा. विश्वेश्वर नगर, पिंपरगव्हाण रोड, बीड ता. जि. बीड के दिनांक १८/१०/२०२३ रोजी बीड येथे मयत झालेल्या आहेत अर्जदार क्र.१ व २ चे मुले आहेत अर्जदार क्र.३ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. मयताची पत्नी हौसाबाई हया पूर्वीच मयत झालेल्या आहेत. मयताचे आई वडील हे फार पुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही नाहीत अर्जदाराचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरिता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यानी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या न्यायालयामध्ये हजर होवून आपली हरकत द्यावी, जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कात त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील दिनांक २०/०६/२०२४

आज दिनांक १५/०५/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली

स्वाक्षरीत/-
क.लिपिक

कोर्टाचा शिक्का

स्वाक्षरीत/-
अधिक्षक
दि.न्यायलय व.स्तर बीड

# पतप्रधानांना उद्योजक, कलाकार, खेळाडूंना भेटायला वेळ, पण शेतकऱ्यांना भेटत नाहीत : भारत दिघोळे

देशातील उद्योजक, कलाकार, खेळाडू, राजकारणी यांना भेटणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी शेतकऱ्यांना भेटत नसल्याचे वक्तव्य महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे नेते भारत दिघोळे यांनी केलं. कृषीप्रधान अशी ओळख असलेल्या देशात शेतकऱ्यांनाच आपले प्रश्न मांडण्यासाठी पंतप्रधान वेळ देत नाही. हे शेतकऱ्यांसाठी दुर्दैवी आहे. कांद्यावरील निर्यात बंदी कोणत्याही अटी शर्ती शिवाय सुरू करावी. तसेच कांदा निर्यात बंदीपासून मागील नऊ महिन्यात शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीपोटी दरातील फरक म्हणून सरकारने शेतकऱ्यांना प्रति क्विंटल २००० रुपयांची नुकसान भरपाई द्यावी अशी मागणीही दिघोळे यांनी केली.

भारत दिघोळेंना सिन्नर एमआयडीसी पोलिस ठाण्यात केलं स्थानबद्ध

पिंपळगाव बसवंत येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पाचव्या टप्प्यासाठी सभा आयोजित करण्यात आली होती. सभेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांना सिन्नर एमआयडीसी पोलिस ठाण्यात स्थानबद्ध करण्यात आले होते. पोलिसांनी सकाळपासूनच त्यांना पोलिस ठाण्यात नजरकैद ठेवले आहे. यानंतर दिघोळे यांनी एक प्रेसनोट प्रसिद्ध करत त्यांची भूमिका मांडली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी शेतकऱ्यांना वेळ देत नसल्याचे पंतप्रधान म्हणाले.



रात्रभर दिघोळे यांच्या नाशिकमधील निवासस्थानी पोलिस

मंगळवारी (१४ मे रोजी) दुपारी पोलिस निरीक्षक यशवंत बाविस्कर यांनी घरी जाऊन भारत दिघोळे यांना कलम१४९ अंतर्गत प्रतिबंधात्मक नोटीस बजावली होती. काल रात्रभर दिघोळे यांच्या नाशिकमधील निवासस्थानी पोलिस निगराणी ठेवण्यात आली होती. तर आज सकाळीच एमआयडीसी सिन्नर पोलीस ठाण्याचे गोपनीय शाखेचे हवालदार भगवान शिंदे, रोशन गायकवाड, प्रकाश उंबरकर यांनी भारत दिघोळे यांना घरातून ताब्यात घेतले. तसेच त्यांना सिन्नर पोलिस ठाण्यात स्थानबध्द केले. दिवसभर पोलिस ठाण्यात पोलिसांच्या निगराणीत ठेवण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रचारसभा संपल्यानंतर भारत दिघोळे यांना सोडून देण्यात आले आहे.

राज्यात कांद्याच्या दराच्या मुद्द्यावरुन शेतकरी आक्रमक

सध्या राज्यात कांद्याच्या मुद्द्यावरुन राजकीय वातावरण चांगलच तापलं आहे. विविध शेतकरी संघटनांसह शेतकरी आक्रमक झाले आहेत. आज नाशिकमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींची सभा झाली. यावेळी पंतप्रधानांनी शेतकऱ्यांसाठी वेळ द्यावा. कांद्याच्या मुद्यावर तोडगा काढावा अशा प्रकारची मागणी शेतकऱ्यांनी केली होती. दरम्यान, पंतप्रधान मोदी यांच्या सभेवेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी शेतकरी संघटनेचे अनेक कार्यकर्त्यांना ताब्यात घेतलं होतं.

# कांद्याचे ४०० कंटनेर अडकले



केंद्र सरकारने लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्पापूर्वी राज्यातील शेतकऱ्यांना गिफ्ट दिले होते. चार महिने २७ दिवसानंतर कांद्यावरील निर्यातबंदी हटवली. ४० टक्के निर्यात शुल्क लावून कांद्याची निर्यात करण्यास सरकारने परवानगी दिली. परंतु त्यानंतर अडचणी काही सुटत नाही. निर्यातबंदीचा निर्णय मागे घेऊन चार दिवसांपासून तांत्रिक कारणामुळे कांद्याचे ४०० कंटनेर बंदरावरच अडकले. त्याचा फटका व्यापाऱ्यांना बसत आहे. आता आज ही अडचण दूर होण्याची शक्यता आहे.

४०० कंटनेर बंदरावरच अडकले


शेतकऱ्यांसाठी कांदा आणि टॉमेटो ही पिके नेहमी अडचणीची ठरतात. कधी अवकाळीचा फटका तर कधी बाजारभावाचा धोका या पिकांना बसतो. कमी उत्पन्न होताच दर वाढू नये म्हणून सरकारकडून निर्यातबंदी केली जाते. यामुळेच जवळपास पाच महिन्यांपासून कांद्याच्या निर्यातीस बंदी होती. अखेर ही बंदी ३ मे २०२४ रोजी मागे घेतली गेली. त्यासंदर्भातील आदेश आला. परंतु जेएनपीटी आणि कस्टम विभागाची वेबसाईट अपडेट न झाल्यामुळे गोंधळ उडाला. चार दिवसांपासून वेबसाईट अपडेट झाली नसल्याने जवळपास ४०० हून अधिक कांद्याचे कंटेनर मुंबईच्या जेएनपीटीमध्ये अडकले. यामुळे कांद्याची निर्यात बंदी उठवल्यानंतर देखील कांद्याचा वांदा सुरूच आहे.

काय झाली अडचण : कांद्या निर्यातबंदीसंदर्भात काढण्यात आलेल्या अधिसूचनेमध्ये स्पष्टता नव्हती. यामुळे ही वेबसाईट अपडेट व्हायला उशीर लागला. तांत्रिक अडचणीमुळे नाशिकच्या जामोरीतील दीडशे ते पावणेदोनशे कंटेनर जेएनपीटी बाहेर अडकले. कंटेनर कोळंबल्याने जहाजाचे भाडे देखील वाया गेले. त्याचा फटका व्यापाऱ्यांना बसला. आता आज परिस्थिती सुरळीत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

वाढत्या उन्हाचा कांद्यास फटका: कांद्याला भाव मिळेल या आशेने येवल्यातील अनेक शेतकऱ्यांनी उन्हाळी कांद्याचे पीक घेतले. मात्र ज्यावेळी कांदा विक्रीस आला. त्यावेळेस कांदा व्यापारी व माथाडी कामगारांमधील संघर्षामुळे बाजार समिती बंद होत्या. गेल्या महिन्याभर बाजार समिती बंद होत्या. त्यात उन्हाचा तडाख्यामुळे साठवलेला कांदा खराब झाला. यामुळे कांद्यावर केलेला खर्च देखील निघणे अवघड झाले आहे. यामुळे पुन्हा एकदा बळीराजा संकटात सापडला आहे.

# स्वयंपाकघरातून बटाटा गायब, भाजीपाल्यांच्या दरात मोठी वाढ

देशात सध्या लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. आत्तापर्यंत चार टप्प्यातील मतदान प्रक्रिया पार पडली आहे. आणखी तीन टप्प्यातील मतदान प्रक्रिया बाकी आहे.. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सरकार देशात महागाई वाढू नये यासाठी प्रयत्न करत आहे. पण महागाई वाढताना दिसत आहे. सध्या भाजीपाल्यांच्या दरात मोठी वाढ झालीय. विशेषत: बटाट्याच्या दरात मोठी वाढ झालीय. त्यामुळं स्वयंपाक घरातून बटाट गायब झाला आहे.



बटाट्याबरोबरच अन्य भाज्यांच्या दरात देखील वाढ

सध्या देशात एका बाजूला उष्णतेचा कहर आहे, तर काही बाजूला अवकाळी पाऊस आहे. या हवामानाच्या स्थितीचा बटाट्याच्या उत्पादनावर देखील परिणाम झालाय. त्यामुळं बाजारात बटाट्याचे प्रमाण कमी आहे. मागणी जास्त आणि पुरवठा कमी आहे. या स्थितीमुळं बटाटाच्या दरात वाढ होताना दिसत आहे. बटाट्याबरोबरच अन्य भाज्यांच्या दरात देखील वाढ होताना दिसत आहे.

टोमॅटोच्या दरात घट तर बटाट्याच्या दरात वाढ

दिल्लीतील आझादपूरची बाजारपेठ अशिया खंडातील सर्वात मोटी बाजारपठ आहे. या बाजारात एका बाजूला बाजारात टोमॅटोच्या दरात घसरण होत आहे. तर दुसऱ्या बाजूला बटाट्याच्या दरात वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. हिमाचल प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश, हरियाणा आणि पंजाबमधून आवक वाढल्याने टोमॅटोच्या दरात घट झाली आहे. तर बटाट्याचे भाव अजूनही चढेच आहेत. बटाट्याच्या दरात आणखी वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

बटाट्याच्या दरात आणखी ५ ते १० टक्क्यांची वाढ होण्याची शक्यता

व्यापाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार बटाट्याच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. येत्या काही दिवसांत आणखी बटाट्याच्या दरात ५ ते १० टक्क्यांची वाढ होण्याची शक्यता आहे. अवकाळी पावसामुळे बटाटा पिकाचे अनेक ठिकाणी मोठं नुकसान झालं आहे. यामुळेच बटाट्याच्या उत्पादनात घट झाली आहे. याचा परिणाम दरांवर होत आहे. सध्या बटाट्याच्या दरात वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

नवीन पिक बाजारात येईपर्यंत दरात वाढ कायम राहणार

दरम्यान, बटाट्याचे नवीन पीक बाजारात येईपर्यंत कमी प्रमाणात बटाटा बाजारात येत आहे. त्यामुळं दरातही वाढ होत आहे. दरम्यान, मिळालेल्या माहितीनुसार, डिसेंबर महिन्यात बटाट्याचे पिक बाजारात येण्याची शक्यता आहे. त्यामुळं आणखी पाच सहा महिने बटाट्याचे दर वाढलेलेच राहतील अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे.


कोल्ड स्टोरेजची तपासणी सुरु

वाढत्या किंमती रोखण्यासाठी सरकारनं हालचाली सुरु केल्या आहेत. देशात उत्तर प्रदेशात सर्वात ज्ात बटाट्याचे उत्पादन होते. किंमती नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकारनं कोल्ड स्टोरेजची तपासणी सुरु केली आहे. कारण व्यापाऱ्यांनी कोल्ड स्टोरेजमध्ये बटाट्याटा साठा केल्याची शक्यता आहे. लोकसभा निवडणुकीननंतर तपासणीच्या कामाला अधिक वेग येईल अशी माहिती सुत्रांनी दिली आहे. दरम्यान, बटाटा आणि भाजीपाल्याच्या किमंती वाढत असल्यामुळं व्हेज थाळी महाग होत आहे.

# गावरान आंब्याची रसाळी ; चवच लय न्यारी, कुठे जपली तीन पिढ्यांनी खास आमराई

आजी-आजोबांनी लागवड केलेले व नैसर्गिक उगवलेली शेतातील गावरान आंबे मोठ्या प्रमाणावर कमी झाली आहेत. आमराया नष्ट झाल्याने गावरान आमरसाची रसाळी काही होत नाही. ग्रामीण भागात सुद्धा गावरान आंब्यांकडे कोणी ढुंकूनही पाहत नाही. मात्र, वाशीम जिल्हयातील आमखेडा या गावात अविनाश जोगदंड यांच्या शेतातील शेकडो वर्षे जुण्या आमराई आजही गावाचे गोडपण जपत आहेत. तीन पिढ्यांनी गावरान आंब्यांचा हा गोडवा जपला आहे.

१०० वर्षांपूर्वीचा वारसा : सुमारे १११ वर्षांपुर्वी भिवाजी जोगदंड यांनी लावलेले हे आंबा वृक्ष बाबारावजी जोगदंड यांनी संवर्धित केले. तो वारसा त्यांच्या चौथ्या पिढीनेआजही जतन केला आहे. कुटुंबातील सदस्याप्रमाणे जोगदंड कुटुंब या गावरान आंबा वृक्षाची काळजी घेतात. आमखेडा गावातील या आमराईंना आंब्यांचा बहर आला आहे. उन्हाळयात याच आंब्यांचा उपयोग रसाळीसाठी करून गावचे गोडपण जपले जात आहे. . तीन



पिढ्या आजही एकत्र

आमखेडा येथील जोगदंड कुटुंबात तीन पिढ्यातील तब्बल २७ सदस्य आजही एकत्र राहतात. त्यांच्या शेतातील आमराईत घोश्या, गोटया,शेप्या,खोबऱ्या,भोपळी, साखऱ्या,शेंद्र्या, केळ्या आदी गावराण आंबे आहेत. कार्बाईड या रसायनाने पिकवलेल्या आंब्यापेक्षा ग्रामीण भागात आजही या गावराण आंब्यांना प्रचंड मागणी असते. या आंब्यांची तुरट-आंबट गोड चवीने तोंडाला एक खास स्वाद येतो.

गावगाड्यातील परंपरा जपली : पूर्वी खेड्यात एकमेकांच्या घरी आंबे देण्याची पद्धत होती. आमराई लुप्त झाल्यामुळे खेड्यात अलीकडे आंबे देण्याची परंपरा राहिलेली दिसत नाही. मात्र कुठलाही व्यावसायिक दृष्टीकोन न ठेवता जोगदंड कुटुंबियांबरोबरच गावगाडयातील लोकांना उन्हाळयात याच गावराण आंब्यापासुन रसाळी चाखता येते हे विशेष. आढ्यांचा घमघमाट : घरात प्रवेश करण्यापूर्वीच पिकविण्यासाठी टाकलेल्या गावरान आंब्याच्या आढ्यांचा सुगंध जिभेस पाणी आणत असे. पाहुणे आल्यावर त्यांच्यासमोर बादलीभर पाणी व टोपलेभर आंबे ठेवले जात. आमरस अन्? पोळी हा विशेष पाहुण्यांचा पाहुणचाराचा खास मेनू असायचा. त्यामुळे आपल्या पुर्वजांनी विकसीत केलेल्या आमराई संवर्धित करण्यासाठी आमखेडा येथील जोगदंड परिवाराचा आदर्श घेण्याजोगा आहे.

# शेतकऱ्यांनो कामाला लागा, हवामान विभागातील तज्ज्ञांनी दिली मान्सूनची चांगली बातमी

शेतकऱ्यांसाठी चांगली बातमी आहे. मान्सूनची वाटचाल वेळेपूर्वी सुरु आहे. नैऋत्य मोसमी वारे (मान्सून) वेळेपूर्वी अंदमानात दाखल होणार आहे. मान्सूनची वाटचाल अशीच राहिली तर यंदा वेळेपूर्वी मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. मान्सून १९ मे (रविवार) पर्यंत अंदमानात दाखल होणार असल्याची माहिती हवामान विभागाचे माजी प्रमुख माणिकराव खुळे यांनी दिली. यामुळे शेतकरी राजाच्या चेहऱ्यावर आनंद झळकणार आहे. मागील वर्षी कमी झाल्यामुळे यंदा वेळेवर येणार मान्सून शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरणार आहे.

मान्सूनच्या हालचाली

दक्षिण बंगालच्या उपसागरात निकोबार बेटे आणि दक्षिण अंदमान समुद्रात मान्सूनच्या हालचाली दिसून येत आहे. दरवर्षी मान्सून २२ मे पर्यंत दाखल होतो. सध्या दक्षिण अंदमान समुद्र आणि निकोबार बेटांवर समुद्र सपाटीपासून १ ते १.५ किलोमीटर उंचीवर नैऋत्येकडून येणारे वारे सुरु आहे. हे वारे मान्सून येणार असल्याची सूचना देतात. पुढील दोन दिवसांत अंदमान बेट आणि बंगालच्या उपसागरात मान्सूनची अधिक प्रगती होणार आहे.

मान्सूनची वाटचालीवर केरळमधील आगमन ठरणार

नैऋत्य मोसमी वारे देशाच्या महासागरीय क्षेत्रात म्हणजेच बंगालच्या उपसागरात दस्तक देणार आहे. यामुळे १ जून रोजी सरासरी तारखेला देशाच्या प्रवेशद्वाराजवळ म्हणजे केरळला मान्सून येणार आहे. बंगालच्या उपसागरात मान्सूनची वाटचाल कशी राहिल, यावर १ जूनची तारीख निश्चित ठरवली जाणार आहे.

हे सुद्धा वाचा: नवरा-बायकोचे भांडण, राग शहरावर, पुणे शहरात बॉम्बस्फोट करण्याची धमकी, भारताचा असा पासपोर्ट ज्यात व्हिसा शिवाय कोणत्याही देशात एन्ट्री, विदेशात बनतात ,२०२४: दहावी, बारावीच्या निकालासाठी यंदा आणखी एक नवीन पद्धत, अभिनेता गोविंदा प्रचारासाठी आला पण उमेदवाराचे नाव विसरला त्याने लोकांना जिंकले पण

यंदा चांगला पाऊस : अवकाळी पाऊस १९ मे पर्यंत कायम राहणार आहे. १९ मे नंतर अवकाळी पावसाचे वातावरण कमी होणार आहे. यंदा पाऊस सरासरीपेक्षा जास्त होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. हवामान विभागाने एप्रिलमध्ये पावसाचा अंदाज व्यक्त केला होता. यंदा पाऊस १०६% राहणार असल्याचा अंदाज आहे. त्यानंतर पुन्हा मे महिन्याचा शेवटी सुधारित अंदाज व्यक्त करणार आहे.

मध्य महाराष्ट्रात पाऊस होणार : बिहार आणि झारखंडसह अनेक राज्यांमध्ये पाऊस पडत आहे. दरम्यान, आयएमडीने ताज्या अलर्टमध्ये म्हटले आहे की सध्या कर्नाटकमध्ये चक्रीवादळ सक्रीय आहे. त्यामुळे पुढील ५ दिवसांत मध्य प्रदेश, विदर्भ, छत्तीसगड, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात गडगडाटी वादळ, विजांचा कडकडाट आणि सोसाट्याचा वारा (४०-६० किमी प्रतितास) यासह मध्यम ते मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८६६ : अमेरिकेत पाच सेन्ट किंवा निकेल हे नाणे व्यवहारात आणले.
१८९९ : क्रांतिकारक बाळकृष्ण चाफेकर यांना फाशी.
१२०४ : बाल्डविन नववा पहिला लॅटिन सम्राट झाला.
१६०५ : पॉल पाचवा पोपपदी.
१९१८ : अमेरिकेत सरकारवर टीका करणे हा तुरुंगवासास पात्र गुन्हा ठरवण्यात आला.
१९२० : पोप बेनेडिक्ट पंधराव्याने जोन ऑफ आर्कला संत ठरवले.
१९२९ : हॉलिवूडच्या ॲकेडमी ऑफ मोशन पिक्चर, आर्ट्स अँड सायन्सेस या संस्थेतर्फे चित्रपटांतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल स्मृतिचिन्ह देण्याचा पहिला समारंभ झाला. याच पारितोषिकांना पुढे ऑस्कर असे नाव पडले.
१९६९ : सोवियेत संघाचे अंतराळयान व्हेनेरा ५ शुक्रावर उतरले.
१९७५ : सिक्कीममधील जनतेने कौल दिल्यावर भारताने सिक्कीमला देशाचा भाग करून घेतले.
१९७५ : जुन्को ताबेई एव्हरेस्टवर चढणारी प्रथम स्त्री ठरली.
१९९३ : बचेन्द्री पालच्या नेतृत्वाखालील पहिल्या महिला भारतीय मोहिमेने सात मुलींसह अठरा गिर्यारोहकांना एव्हरेस्ट पादाक्रांत करण्याचा मान मिळवून दिला व नवा जागतिक विक्रम नोंदविला.
१९९२ : स्पेस शटल एन्डेव्हरची प्रथम अंतराळयात्रा सफल.
१९९६ : भारताचे १० वे पंतप्रधान म्हणून अटलबिहारी वाजपेयी यांनी सूत्रे हाती घेतली. मात्र आवश्यक पाठिंबा न मिळाल्यामुळे त्यांचे सरकार केवळ १३ दिवस टिकले.
२००० : बॅडमिंटन अधिकाधिक लोकाभिमुख करण्यासाठी तसेच खेळांचे दूरचित्रवाणी प्रसारण सुलभ करण्यासाठी या खेळातील गेम १५ ऐवजी ७ गुणांचा करण्याचा निर्णय आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन महासंघाच्या क्वालालंपूर येथील बैठकीत घेण्यात आला. मात्र २००६ मधे हा नियम परत बदलला गेला.
२००५ : कुवेतमधे स्त्रियांना प्रथमच मतदानाचा हक्क प्राप्त झाला.
२००५ : अमेरिकन वैज्ञानिकांनी क्लोन केलेल्या मानवी भ्रूणाच्या शरीरातून स्टेम पेशी काढण्यात पहिल्यांदा यशस्वी झाले.
२००७ : निकोलाय सारकॉझी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष बनले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२५ : आद्य गणिती, आधुनिक भास्कराचार्य केरुनाना लक्ष्मण छत्रे यांचा जन्म. (मृत्यू: १९ मार्च १८८४)
१८३१ : मायक्रोफोन चे सहसंशोधक डेव्हिड एडवर्ड ह्यूजेस यांचा जन्म. (मृत्यू: २२ जानेवारी १९००)
१८२४ : महान गणितज्ज्ञ केरो लक्ष्मण छत्रे यांचा जन्म
१८५७ : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पटना येथील २७ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष रघुनाथ मुधोळकर यांचा जन्मदिन.
१९०५ : अमेरिकन अभिनेते हेन्री फोंडा यांचा जन्म. (मृत्यू: १२ ऑगस्ट १९८२)
१९२६ : माणिक वर्मा, शास्त्रीय व सुगम संगीत गायिका.
१९३१ : के. नटवर सिंग, भारतीय परराष्ट्र मंत्री.
१९४१ : संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय टक्करवादक बनामाली महाराणा यांचा जन्मदिन.
१९४४ : महाराष्ट्रातील एक प्रसिध्द लोकनेते अभयसिंह राजे भोसले यांचा जन्म
१९५३ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय बायोफिजिकल वैज्ञानिक प्राचार्य रामकृष्ण विजयाचार्य होसूर यांचा जन्मदिन.
१९५५ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय हातमाग उद्योजक गजम अंजैया यांचा जन्मदिन.
१९७० : गॅब्रियेला सॅबाटिनी, आर्जेन्टिनाची टेनिस खेळाडू.
१९७५ : निरोशन बंदरतिलके, श्रीलंकेचा क्रिकेट खेळाडू.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६५ : पुरंदर किल्ला लढविताना मराठेशाहीतील स्वामीनिष्ठ सरदार मुरारबाजी देशपांडे यांचे प्राणार्पण
१८३० : फ्रेन्च गणितज्ञ व भौतिकशास्त्रज्ञ जोसेफ फोरियर यांचे निधन. (जन्म: २१ मार्च १७६८)
१९२६ : महमद सहावा, शेवटचा ओस्मानी सम्राट.
१९५० : कोल्हापूर संस्थानचे दिवाण व शिक्षणमंत्री अण्णासाहेब लठ्ठे यांचे निधन. (जन्म: ९ डिसेंबर १८७८)
१९७७ : माली देशाचे पहिले अध्यक्ष मादीबो केएटा यांचे निधन. (जन्म: ४ जुन १९१५)
१९९० : द मपेट्स चे जनक जिम हेनसन यांचे निधन. (जन्म: २४ सप्टेंबर १९३६)
१९९४ : माधव मनोहर, लेखक, समीक्षक.
१९९४ : चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व पटकथा लेखक फणी मुजुमदार यांचे निधन. (जन्म: २८ डिसेंबर १९११ फरिदपूर, बांगला देश)
२००० : माधव गोविंद काटकर, मराठी कवी.
२००८ : ओपस वन व्हाइनरी चे सहसंस्थापक रॉबर्ट मोन्डवी यांचे निधन. (जन्म: १८ जुन १९१३)
२०१४ : टाटा स्टीलचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक रुसी मोदी यांचे निधन. (जन्म: १७ जानेवारी १९१८)

# आई-वडिलांच्या लग्नाचा वाढदिवस साजरा करून मुलांची अशी ही कृतज्ञता

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आज माणूस जन्म हा प्रत्येकाला नशिबाने मिळत असतो. माणूस जन्म हा सर्वश्रेष्ठ असून हा जन्म मिळाल्यानंतर प्रत्येकाने सत्कर्म करणे अपेक्षित असते. संत सांप्रदाय आणि अध्यात्म आपल्याला हेच शिकवतं. जगातील सर्व नात्यांमध्ये सर्वात विश्वासू आणि मायेचे व प्रेमाचे नाते म्हणून माणूस आई-वडिलांचे आणि मुलांचे नाते आहे. या नात्याला जपण्याचा अनेकांचा प्रयत्न असतो. प्रत्येकजण आपआपल्या आई-वडिलांची कृतज्ञता व्यक्त करण्याचा प्रयत्न करत असतो. मात्र, समाजात असेही काही अभागी आहेत की त्यांना आई-वडिलांच्या पुण्याईने व आशीर्वादाने सर्व काही मिळाले तरी स्वार्थाची हाव सुटत नाही. परंतु यात काही मुले अशी असतात की, ज्यांच्यामुळे आम्ही घडलो आणि ज्यांच्यामुळे आम्ही आहोत त्यांची कृतज्ञता आगळ्यावेगळ्या पद्धतीने व्यक्त करण्याचा संकल्प केलेला असतो. अंबाजोगाई शहरातील अर्जुनराव थोरात हे महावितरणमधील सेवानिवृत्त अधिकारी संपूर्ण हयात त्यांनी नोकरीत व शासकीय सेवेत घालविली. हे करत असताना सामाजिक जाणिवा जिवंत ठेवून त्यांनी आपले कर्तव्य अदा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांची मुले सचिन थोरात, डॉ. संदीप थोरात व कुलदीप थोरात यांनी आपल्या आई-वडिलांच्या कृतज्ञतेपोटी आई-वडिलांच्या लग्नाचा ५० वा वाढदिवस मोठ्यशा उत्साहात आणि थाटामाटात पार पाडला. या सोहळ्याला त्यांचे समकालीन मित्र-मैत्रिणी, वर्गमित्र, नोकरीतील सहकारी मित्र यांना निमंत्रित करून तो आनंद द्विगुणीत करण्याचा प्रयत्न केला. मुलांचे हे कौतुक पाहून आईवडिलांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले आणि खर्या अर्थाने आपले जीवन सार्थकी लागल्याची त्यांची भावना बनली.

अंबाजोगाई व धारूर या दोन तालुक्यांच्या पंचक्रोशीत अर्जुनराव थोरात या नावाचे वलय आहे. धारूर तालुक्यातील पांगरी या गावी त्यांचा जन्म झाला. शिक्षणाच्या निमित्ताने



अंबाजोगाई गाठली. अंबाजोगाई येथे संपूर्ण संस्कार झाले आणि उच्च शिक्षण घेऊन याच ठिकाणी महावितरणमध्ये नोकरी करण्याची संधी मिळाली. नोकरी करीत असताना सामाजिक भान जिवंत ठेवून अनेकांना मदत व सहकार्य केले. त्या सोबत आपल्या सहकारी कर्मचार्यांची आर्थिक स्थिती भक्कम झाली पाहिजे व त्यांना त्यांच्या अडचणीच्या काळात आर्थिक मदत झाली पाहिजे. या हेतूने जवळपास ४० वर्षांपूर्वी वीज कामगार सहकारी पतसंस्थेची उभारणी केली. आजही ही पतसंस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि प्रत्येकाला वेळेवल पैसे देणारी पतसंस्था ठरली आहे. या पतसंस्थेच्या नंतर आलेल्या अनेक पतसंस्था लयास गेल्या आहेत. मात्र, अर्जुनराव थोरात यांच्या नियोजनामुळे आजही ही पतसंस्था नावारूपाला आलेली आहे. त्यांची तीनही मुले चांगल्या ठिकाणी चांगल्या पदांवर कार्यरत आहेत. आपल्या मुलांवर चांगले संस्कार रूजवून त्यांना सक्षम बनविण्याचे काम त्यांच्या हातून झाले आहे. तर अर्जुनराव थोरात यांच्या जीवनाला आकार देण्याचे काम खर्या अर्थाने त्यांच्या अर्धांगिनी व सहचारिणी सौ. अनिताताई अर्जुनराव थोरात यांनी केले. या दाम्पत्याने मुलांना उच्च दर्जाचे शिक्षण देऊन समाजामध्ये मानापानाचे स्थान मिळवून दिले. पुढे मुले सुद्धा सुसंस्कारित होऊन त्यांनी आई-वडिलांच्या मार्गदर्शनाखाली सुखी व आनंदी जीवनाचा मार्ग निवडला. आई-वडिलांनी जे संस्कार केले आणि जीवनामध्ये ज्यांच्यामुळे आपणास नाव व प्रतिष्ठा मिळाली अशा आई-वडिलांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सौ. अनिताताई थोरात व अर्जुनराव थोरात यांच्या सहजीवनाच्या ५० व्या वाढदिवसाचे निमित्त साधून लग्नाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करण्याचा संकल्प केला. त्यानुसार गुरुवार, दि. ९ मे रोजी या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यासाठी अर्जुनराव थोरात यांचे सर्व स्नेही मित्र, समकालिन मित्र, वर्गमित्र, नोकरीच्या काळात ज्यांचा ज्यांचा संबंध आला असे सर्व सहकारी, आईच्या सर्व मैत्रिणी, नातेवाईक, स्नेहीजन, आप्तेष्ट व समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांना निमंत्रित करून हा सोहळा मोठ्या हर्षोल्हासात आणि तीन पिढ्यांच्या साक्षीने उत्साहात पार पडला. आई-वडिलांची अनोखी कृतज्ञता व्यक्त करणारे त्यांचे सपूत सचिन, डॉ. संदीप व कुलदीप यांचे करावे तेवढे कौतुक कमी आहे. कारण प्रत्येकाला आई-वडिल जन्म देत असतात. परंतु तो जन्म सार्थकी लावणारे आणि त्याची जाणीव ठेवणारे मुले सुद्धा कमी असतात. हे लक्षात घेणे गरजेचे आहे. थोरात कुटुंबियांनी अनेकांसमोर हा आदर्श निर्माण केला आहे.

# इंगळे महाराज परमार्थ आश्रमातील सप्ताहाची उद्या सांगता

## सोपान काका महाराज शास्त्री यांचे होणार काल्याचे किर्तन

वडवणी । प्रतिनिधी

महाराष्ट्रात आपल्या विशेष विनोदी शैलीने गाजलेले कीर्तनकार वै. संत बाबासाहेब महाराज इंगळे यांच्या पुण्यतिथीनिमित्त चिंचवडगाव येथील संत इंगळे महाराज परमार्थ आश्रमामध्ये आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची उद्या शुक्रवारी सांगता होणार आहे. आतापर्यंत राज्यातील नामवंत कीर्तनकारांची या ठिकाणी हजेरी लाभली आहे इंगळे महाराज परमार्थ आश्रमाचे अध्यक्ष सोपान काका महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे या सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन परमार्थ आश्रमाच्या वतीने करण्यात आले आहे.

वडवणी तालुक्यातील चिंचवडगाव येथे बाबासाहेब महाराज इंगळे यांनी परमार्थ आश्रमाची स्थापना केलेली आहे. धार्मिक क्षेत्रांमध्ये खूप मोठे कार्य केले आहे.

बाबासाहेब महाराज इंगळे हे आपल्या विनोदी कीर्तनाच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि इतर राज्यातही प्रसिद्ध झाले होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात घराघरात त्यांना भाविक ओळखत होते. त्यांच्या निधनामुळे वारकरी संप्रदायामध्ये खूप मोठी पोकळी निर्माण झालेली आहे त्यांच्या पुण्यतिथी निमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी इंगळे महाराज परमार्थ आश्रमामध्ये अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले आहे या सप्ताह सोहळ्यातील पाच दिवसाचे कार्यक्रम मोठ्या थाटामाटात पार पडलेले आहेत. उर्वरित दोन-तीन दिवसाचे सुंदर नियोजन करण्यात आलेले आहे. परवा शुक्रवारी सोपान काका महाराज इंगळे यांच्या काल्याच्या किर्तनाने या सोहळ्याची सांगता होणार आहे तरी भाविकांनी काल्याचे किर्तन आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन इंगळे महाराजांचे चिरंजीव सोपान काका महाराज इंगळे, रामेश्वर महाराज इंगळे, माऊली महाराज इंगळे आणि सर्व भक्तगण परिवाराने केले आहे.

### भव्य नियोजन

हा सप्ताह सोहळा यशस्वी करण्यासाठी परमार्थ आश्रमाच्या वतीने चांगले नियोजन करण्यात आले आहे. भव्य मंडप उभारण्यात आला आहे भोजनाची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे पार्किंग साठी दहा एकर जागेमध्ये दोन्ही बाजूला व्यवस्था करण्यात आली आहे. पाण्याची व्यवस्था तसेच सुरक्षा समिती स्थापन करण्यात आली आहे सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विविध समित्यांची स्थापना करून भाविकांना जेवणाचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

### हजारो सेवेकरी यांचे नियोजन

चिंचवडगाव येथील इंगळे महाराज परमार्थ आश्रमात होणारा हा सप्ताह महाराष्ट्रातील सर्वात मोठा सप्ताह म्हणून पाहिला जात आहे. या सप्ताहासाठी लाखो भाविकांची या ठिकाणी गर्दी होत असल्याने परिसरातील हजारो भक्तगण या ठिकाणी नियोजन करत आहेत या ठिकाणी आलेल्या सर्व भाविकांची सेवा करण्यासाठी परिसरातील चिंचवडगाव, काडीवडगाव, राजा हरिश्चंद्र पिंपरी, खळवट लिमगाव, देवडी, चींचोटी, चिंचाळा, देवगाव, परडी माटेगाव आदी अनेक गावातील भाविक या ठिकाणी यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

### नामवंत कीर्तनकारांची झाली कीर्तने

या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये राज्यातील नामवंत कीर्तनकारांनी पहिल्या पाच दिवसांत हजेरी लावली आहे. शुक्रवार दि. १० मे रोजीपासुन अनुक्रमे ह भ प रामायणाचार्य राजाराम महाराज सूर्यवंशी, ह भ प रामायणाचार्य नामदेव महाराज लबडे, ह भ प प्रकाश महाराज साठे, कीर्तन केसरी पांडुरंग महाराज गिरी नाशिक, समाज प्रबोधनकार निवृत्ती महाराज इंदुरीकर, विलास महाराज गेजगे यांचे किर्तने पार पडले आहेत. आज कोकीळ सम्राट विशाल महाराज खोले तर उद्या किर्तन केसरी अक्रूर महाराज साखरे यांचे कीर्तने रात्री आठ ते दहा या वेळेत होणार आहे. तर शुक्रवार दिनांक १७ मे रोजी सकाळी नऊ वाजता ह. भ. प. सोपान काका महाराज इंगळे शास्त्री अध्यक्ष इंगळे महाराज परमार्थ आश्रम यांचे काल्याचे किर्तन होणार आहे.

# दोन चिमुकल्याचा जीव घेणाया मातेला बर्दापुर पोलिसांनी केली अटक

अंबाजोगाई । प्रतिनिधी

प्रतिनिधी स्वयंपाक जास्त का केलास असे सासुने विचारल्यामुळे राग अनावर झाल्याने विवाहितेने स्वतःच्या दोन लेकरांना विषारी औषध पाजून त्यांचा जीव घेतल्यानंतर तीने स्वतःही औषध प्राशन केले. तीला आज बुधवारी दवाखान्यातून सुट्टी झाल्यानंतर बर्दापुर पोलिसांनी या महिलेला अटक केले आहे.

अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापुर येथील कौशल्या भिमराव दोडतले (वय २३) टेकडी गल्ली बर्दापुर असे त्या विवाहितेचे नाव असून शुक्रवारी (दि.१० मे) रोजी तीचा पती भिमराव हा धनंजय मुंडे यांच्या सभेला गेला होता. यावेळी घरात असलेल्या सासुने स्वयंपाक जास्त का केलास असे कौशल्या भिमराव दोडतले (वय २३) हिला विचारले असता रागाच्या भरात तीने तीन वर्षाची मुलगी प्रांजल व दोन वर्षाचा मुलगा कार्तिक यांना घेवून स्वतःच्या खोलीत गेली तिथे तीने दोन्ही मुलांना विषारी औषध पाजविले सभा संपल्यानंतर भिमराव घरी आल्यावर आईने त्याला कौशल्या रूसून खोलीत बसल्याचे सांगितले. त्यानंतर भिमराव खोलीत गेला असता त्यांच्या मुलांच्या नाकाला फेस आल्याचे दिसले त्यावर मुलाच्या नाकाला व्हसलीन लावल्याचे कौशल्याने सांगितले.

परंतु मुलांच्या नाकातून रक्तही येत असल्याने आणि मुलांची काहीच हालचाल होत नसल्याने घाबरलेल्या भिमरावाने मुलांना खांद्यावर घेत बाहेर आणले. आणि आरडा ओरडा करून गल्लीतील लोकांना बोलावले. यानंतर कौशल्याने वरच्या खोलीत जावून विषारी औषध प्राषण केले. यानंतर भिमरावाने दोन मुलांसह पत्नीलाही लातूरच्या खाजगी रूग्णालयात दाखल केले.परंतु तेथील डॉक्टरांनी दोन्ही मुले मयत झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. तर कौशल्यावर उपचार सुरू होते. तिला आज बुधवारी अंबाजोगाईतील रूग्णालयातुन सुट्टी होताच बर्दापुर पोलिसांनी तीला अटक केले आहे. मुलांना मारण्याचे कारण आता पोलिस तपासात उघड होणार आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सहाय्यक पोलिस निरिक्षक महेंद्रसिंग ठाकुर हे करीत आहेत.

# टँकरने पाणी पुरवठाबाबत अडचणी आल्यास संपर्क क्रमांकावर तक्रार करावी

बीड । प्रतिनिधी

सद्यस्थितीत बीड जिल्हयामध्ये पर्जन्यमान कमी पडल्यामुळे अत्यल्प पाणी साठा असल्यामुळे नागरिकांना पिण्याचे पाणी मुबलक प्रमाणात नसल्यामुळे जिल्हयातील ब-याच गावांमध्ये भिषण पाणी टंचाई निर्माण झालेली आहे. ज्या गावामध्ये तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली त्या गावाचे प्रस्तावास मंजूरी देवून ग्रामस्थांना टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

तेव्हा ज्या गावामध्ये पाणी टंचाई निर्माण झालेली आहे अशा गावामध्ये टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात येतो परंतु गावामधील ग्रामस्थांना त्यांच्या गावामध्ये टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत असल्याबाबत माहिती होत नाही. ग्रामीण भागामध्ये टँकरने पाणी पुरवठा केल्यास संबंधित गुत्तेदार हा कमी खेपा होतात त्यामुळे ग्रामस्थांना आवश्यक तेवढे पाणी मिळत नाही परिणामी ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागते. ग्रामस्थांना पिण्याचे पाण्याचे टँकर गावामध्ये प्रशासनामार्फत देण्यात आले किंवा कसे तसेच टँकरने पाण्याच्या खेपा कमी होत असल्याबाबत त्या अनुषंगाने ग्रामस्थांच्या तक्रारी असल्याबाबत कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जिल्हा परिषद बीड तथा नोडल अधिकारी पाणी टंचाई बीड यांचे व्हॉटसाॲप क्रमांक ७२७६३२५८९६ व ८६६८३८१४१५ वर तक्रारी नोंद करणे.जेणे करुन टंचाईग्रस्त असलेल्या गावामधील ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याची गैरसोय होणार नाही.

# रिद्धिमा अभिजित सांगळे हिचे सीबीएसई परीक्षेत यश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाईतील राजकारणात व समाजकारणात यशस्वी ठरलेले दिलीपदादा सांगळे यांची नात व डॉ. अभिजित सांगळे यांची कन्या रिद्धिमा अभिजित सांगळे हिने इयत्ता १० सीबीएसई बोर्ड परीक्षेत यश संपादन करून तिने ९७.८० एवढी टक्केवारी प्राप्त केलेली आहे. रिद्धीमा हिचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.



अंबाजोगाईच्या समाजकारणात व राजकारणात दिलीपदादा सांगळे यांचे नाव आहे. तसेच त्यांचे चिरंजीव डॉ. अभिजित हे वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असून ते धानोरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी म्हणून सेवेत आहेत. त्यांची कन्या रिद्धिमा ही लातूर येथील पोद्दार इंटरनॅशनल स्कूलमध्ये इयत्ता १० वीच्या वर्गात शिकत होती. नुकताच सीबीएसई परीक्षेचा निकाल जाहिर झाला असून या परीक्षेत रिद्धीमा हिने ९७.८० एवढे टक्के गुण घेऊन गुणवत्ता यादीत आली आहे. रिद्धीमा हिच्या यशाबद्दल आ. नमिताताई मुंदडा, ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, आयएमए अध्यक्ष डॉ. नवनाथ घुगे, ॲम्पा अध्यक्ष डॉ. राहुल धाकडे, डॉ. निशिकांत पाचेगावकर, अंगदराव कराड, यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी रिद्धीमा हिचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

# अंगणवाडी सेविका अनिया कादरी सेवानिवृत्त

धारूर । प्रतिनिधी

अंगणवाडी सेविका अनिया कौसर खमर कादरी यांनी ३७ वर्षाचे प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त होत असल्या बद्दल ग्रामस्थानी अश्रु भर-या डोळयानी त्याना निरोप दिला अंगणवाडी ताई म्हणूण काम करताना अनेक पिढ्या संस्कारक्षम क्षम बालवया पासून घडवण्याचे काम त्यांनी केले.त्यांना निरोप देताना प्रत्येकाचे डोळे पानावले होते. या अंगणवाडीताईला निरोप देताना मातापालक मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

तालूक्यातील चिंचपूर येथील ३७ वर्षा अंगणवाडी ताई अनिया कौसर खमर कादरी यांनी उत्कृष्ट काम करत येथील अंगणवाडी हि



आदर्श पणे चालवली आपल्या सेवेला सातत्याने प्रथम प्राधान्य दिले संस्कारक्षम व उत्कृष्ट पिढ्या घडवण्याचे काम केले बालवया पासुन जिवन यशस्वी करण्या साठी जेवढे गुणाची गरज असते तेवढे संस्कार बालवयापासुनच करण्यावर या अंगणवाडी ताई नी भर दिल्याने गेल्या ३७ वर्षात अनेक चांगले अधिकारी चांगले नागरीक घडले त्या आपल्या प्रदीर्घ सेवे नंतर एप्रील २०२४ अखेर सेवानिवृत्त झाल्या ही अंगणवाडी जिल्हा भरात आदर।श केली होती त्याना सेवानिवृत्ती निमीत्त ग्रामस्थाचे वतीने सत्कार करून निरोप देण्यात आला.या वेळी सुदामती लांब,किसकींदा लांब,प्रमीला हाडीबांग,सुनिता लांब, राधा शेळके, मोहनराव लांब,सुंदर लांब,धंनजय लांब, उमेश लांब आदी उपस्थीत होते

# जस्मिन मुलांनी दहावी परीक्ष ८४ टक्के गुण मिळविले

बीड । प्रतिनिधी



तुळजापूर येथील जास्मिन मुलांनी या विद्यार्थिनी दहावीच्या सीबीएस पॅटर्नच्या ८४ टक्के गुण मिळवले आहे. तिने या यशाचे श्रेय रेश्मा मुलानी व गुरुजींना दिले आहे. ती ची आई टाटा इन्स्टिट्यूट मध्ये लिपिक या पदावर कार्यरत आहेत. जस्मिन ला या यशाचे शिखर गाठण्यासाठी यांनी खूप परिश्रम घेतले विविध प्रकारचे ट्युशन लावले तसेच तिचा रोज नियमित अभ्यास घेतला. तरी या जस्मिनच्या यशाबद्दल तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. नेत्रदीपक मिळालेल्या यशाबद्दल लोकशाही पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष तसेच शासकीय कॉन्ट्रॅदार तसेच बिलकोन कन्सल्टन्सी चे संचालक आयुब भाई पठाण यांनी तिचे कौतुक केले.

# लिंबागणेश येथे झोटींगबाबा यात्रा साजरी



लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मौजे. लिंबागणेश येथे आज दि.१२ रविवार रोजी ''झोटींग बाबा यांची यात्रा मोठ्या उत्साहात संपन्न झाली.यंदा यात्रेचे १० वे वर्षं असुन माळरानावर जांभळीच्या झाडाखाली असलेल्या झोटींगबाबा यांचे शेतकऱ्यांना पशुधनाबद्दल विशेष महत्त्व असुन पोळ्याच्या दिवशी पंचक्रोशीतील पशुपालन याठिकाणी नारळ फोडुन नैवेद्य दाखवण्यासाठी आवर्जून येतात. ढवळे नाईगडे, घोलप, वाणी, जाधव, थोरात यांची देवस्थान ठिकाणी शेती असणा-या प्रमुखांसह ईतर भाविकांनी गेल्या वर्षी ४ लाख रुपये लोकवर्गणीतून मंदिर बांधले.आज यात्रेनिमित्त आराध्यांच्या गोंधळ कार्यक्रमासह महाप्रसादाची पंगत घालण्यात आली शाकाहारी आणि मांसाहारी दोन्ही प्रकारचे नैवेद्य दाखविण्यात आले.भाविकांनी घरून आणलेल्या भाकरी व त्याठिकाणी केलेल्या भाजीचा महाप्रसादाचे भाविकांनी सेवन केले.

# शुभंकर दाहीतोडे सीबीएसई आष्टी तालुक्यामध्ये प्रथम

आष्टी

तालुक्यातील कडा येथील वर्धमान महावीर इंग्लिश स्कूलचा १००%निकाल लागला असून शाळेतील विद्यार्थी शुभंकर महेश दाहीतोडे - ९६.६% प्रथम क्रमांक, रणवीर माधव चौधरी - ९३.६% द्वितीय क्रमांक, ओम संतोष बनसोडे -९३ % तृतीय क्रमांक तसेच १६ विद्यार्थ्यांनी ८०% पेक्षा जास्त गुण संपादन करून विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण झाले आहेत.



सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष- अमित राठोड, उपाध्यक्ष - संदीप चानोदिया, सचिव हेमंत मेहेर, कोषाध्यक्ष - डॉ. प्रमोद भळगट तसेच संस्थेचे पदाधिकारी मनीष गांधी, प्रकाश श्रीश्रीमाळ, अमोल पटवा, संजय पितळे, संतोष गांधी, मुख्याध्यापक - के. अभिलाष , सल्लागार - पी.जी. मेहेर सर , सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, पालकवर्ग यांच्यासह शिक्षणप्रेमी नागरिकांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.


## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.**

**विष्णु पि.भगवान काशिद विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, साक्षाळपिंप्री ता. जि. बीड**

**पहा विष्णु पि.भगवान काशिद रा.साक्षाळपिंप्री ता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत किसनाथ पि.बापु काशिद** यांचा दिनांक १५/०३/१९४० रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास साक्षाळपिंप्री ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे साक्षाळपिंप्री ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक ०९/०५/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १०/०६/२०२४ ही आहे.**

मार्फत **ॲड. मिलिंद उबाळे** | स्वाक्षरित **तहसिलदार, बीड**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.११३/२०२४**

**अभिमान पि.दगडु करपे विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, कुमशी ता. जि. बीड**

**पहा अभिमान पि.दगडु करपे रा. कुमशी ता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत रंगनाथ पि.राणुजी करपे** यांचा दिनांक १०/०६/१९०२ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास कुमशी ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे कुमशी ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक ०४/०४/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १५/०५/२०२४ ही आहे.**

मार्फत **ॲड. मिलिंद उबाळे** | स्वाक्षरित **तहसिलदार, बीड**

## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.११४/२०२४**

**भगिरथ पि.सुंदरराव करपे विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, कुमशी ता. जि. बीड**

**पहा भगिरथ पि. सुंदरराव करपे रा.कुमशी ता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत लक्ष्मण पि. बपपाजी करपे** यांचा दिनांक १५/०८/१९१३ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास कुमशी ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे कुमशी ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक ०३/०४/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १५/०५/२०२४ ही आहे.**

मार्फत **ॲड. मिलिंद उबाळे** | स्वाक्षरित **तहसिलदार, बीड**

दैनिक राज्य लोकतंत्र
महासंग्राम
गुरूवार दि.१६ मे २०२४


# नंदुरबार लोकसभेत डॉ.हीना गावित विजयाची हॅटट्रिक करणार? की गोवाल पाडवी वडिलांच्या पराभवाचा वचपा काढणार?

**मुंबई | प्रतिनिधी**

राज्यातील लोकसभा निवडणुकांमध्ये हायव्होल्टेज मतदारसंघ म्हणून गणल्या जाणाऱ्या नंदुरबार लोकसभा मतदारसंघात (२०२४) यंदा कोण बाजी मारणार, याकडे आता साऱ्यांचे लक्ष लागले आहे. कारण या मतदारसंघात डॉक्टर विरुद्ध वकील अशा दोन सुशिक्षित उमेदवारांमध्ये हा सामना रंगणार आहे. शिवाय यंदा या मतदारसंघात मतदानच्या टक्केवारीत देखील वाढ झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे या वाढत्या टक्केवारीचा फायदा भाजपच्या महायुतीची उमेदवार डॉ. हीना गावित यांना विजयाची हॅटट्रिक मारण्यास उपयुक्त ठरतो. की कधीकाळी काँग्रेसचा पारंपारिक बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या या मतदारसंघात विजय मोहर उमटवत गोवाल पाडवीं आपल्या वडिलांच्या पराभवाचा वचपा काढणार, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

या निवडणुकीत भाजपा आणि काँग्रेसमध्ये सरळ लढत असल्याचे चित्र दिसून येत आहे. हिना गावित यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, तर गोवाल पाडवी यांच्या प्रचारासाठी काँग्रेसच्या महासचिव प्रियंका गांधी यांची जाहीर सभा नंदुरबार मध्ये झाली. नंदुरबार हा लोकसभा मतदारसंघ आदिवासी बहुल असून या मतदारसंघात आदिवासी मतदारांच्या अनेक समस्या आहेत. या भागात रस्ते, आरोग्य, शिक्षण, रोजगार आणि शेतीसाठी सिंचनासह अनेक मूलभूत समस्यांचा समावेश आहे. या मतदारसंघात यावर्षी मोठ्या प्रमाणात विद्यमान खासदारांच्या बाबतची नाराजी दिसून येत होती. महायुतीच्या मित्रपक्षांनीही भाजप उमेदवाराच्या विरोधात वेगळी चूल मांडल्याचे चित्र नंदुरबार लोकसभा मतदारसंघात होते. तर महाविकास आघाडीच्या वतीने सर्वसामान्य कार्यकर्ते आणि सर्व घटक पक्षाचे नेते एकत्र गोवाल पाडवी यांच्या प्रचारात दिसून आलेत. मात्र राज्यस्तरावरून एकही मोठा नेता प्रचारासाठी आला नसल्याचे चित्र होतं. तर दुसरीकडे भाजपाच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मतदारसंघात दोन सभा घेतल्यात.



## हीना गावित विरुद्ध गोवाल पाडवींमध्ये थेट लढत

नंदुरबार लोकसभा मतदारसंघ हा पारंपारिक काँग्रेसचा बालेकिल्ला होता. २०१४ च्या निवडणुकीत भाजपाने काँग्रेसच्या बालेकिल्लाला खिंडार पाडत नंदुरबार लोकसभा मतदारसंघावर आपला झेंडा फडकवला होता. भाजपा उमेदवार डॉक्टर हिना गावित यांनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माणिकराव गावित यांचा पराभव केला होता. मात्र दहा वर्षानंतर नंदुरबार लोकसभा मतदारसंघात यावर्षी झालेल्या निवडणुकीत मोठ्या चुरशीची लढत पाहण्यास मिळत आहे काँग्रेसकडून नवखा चेहरा असलेले गोवाल पाडवी आणि भाजपा कडून विद्यमान खासदार हिना गावित यांना तिसऱ्यांदा उमेदवारी देण्यात आले आहे.

## मतदानाच्या टक्केवारीत ४ टक्क्यांनी वाढ

मतदारसंघाचा राजकीय विचार केल्यास या लोकसभा मतदारसंघात सहा विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे त्यापैकी चार विधानसभा मतदारसंघ हे महायुतीच्या ताब्यात आहेत. २०१९ मध्ये या मतदारसंघात ६८ टक्के मतदान झाले होते. तर यावर्षी मतदानाची आकडेवारी चार टक्क्यांनी वाढली असून मतदान ७२ टक्के झाले आहे. हे वाढलेले चार टक्के मतदान कुणाच्या फायद्याचे हा महत्वाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित होत आहे. तर अनेक राजकीय हवे दावे सोडून धडगाव, अक्कलकुव्यात राजकीय हाडवैरी असलेले पराडके आणि पाडवी एकत्र झाल्याचे चित्र आहे. तर दुसरीकडे भाजपाचे अंतर्गत कलहाचे वातावरणही या निवडणुकीत भाजपच्या उमेदवारासाठी अडचणीचे ठरू शकते. मात्र असे असले तरी यंदा या मतदारसंघातील लढतीत मोठी चुरस पाहण्यास मिळत आहे. त्यामुळे नेमका विजय कोणाचा होईल हे आता तरी सांगणे शक्य नसल्याची स्थिती नंदुरबार लोकसभा मतदारसंघात आहे.

नंदुरबार लोकसभा मतदार संघ पहिल्यापासून काँग्रेसचा बालेकिल्ला होता. माणिकराव गावित यांनी सलग नऊ पंचवार्षिक या मतदार संघाचे प्रतिनिधित्व केलं आहे. २०१४ च्या निवडणुकीच्या वेळी राष्ट्रवादीतून भाजपात प्रवेश केलेल्या ज्येष्ठ नेते डॉ विजयकुमार गावित यांच्या कन्या डॉ. हीना गावित यांना उमेदवारी देण्यात आली. त्यांनी या मतदार संघात पहिल्यांदा भाजपला यश मिळवून दिले. २०१९ च्या निवडणुकीत काँग्रेसकडून के सी पाडवी यांना या मतदार संघात उमेदवारी देण्यात आली त्यांनी चांगली लढत दिली. राज्यात विजयी झालेल्या भाजपा उमेदवारांचे मताधिक्य लाखांच्या पुढे आसताना मात्र या मतदार संघात भाजपच्या उमेदवाराचा लीड कमी झाला होता या गोष्टींचा विचार करत काँग्रेसकडून निवडणूक रणनीती ठरवली जात असून त्यासाठी तयारी झाली आहे. या मतदार संघात खासदार डॉ. हीना गावित यांना पुन्हा उमेदवारी मिळेल हे जवळपास निश्चित आहे. कारण त्या पंतप्रधान मोदींच्या गुड बुक मधील खासदार असल्याचे त्यांचे कार्यकर्ते सांगतात तर दुसरीकडे पक्षांतर्गत मोठी नाराजी असल्याचे दिसून येते. तर महायुतीच्या मित्र पक्षाच्या वतीने उमेदवार बदलण्याची मागणी करण्यात येत आहे. नंदुरबार जिल्हा पहिल्यापासून काँगेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. मात्र २०१४ च्या मोदी लाटेत काँग्रेसच्या या किल्ल्याला सुरंग लागला. भाजपच्या डॉ. हीना गावित खासदार झाल्या त्यांनतर २०१९ निवडणुकीत पुन्हा विजयी झाल्या. मात्र २०१९ सालच्या निवडणुकीत २०१४ च्या निवडणुकीपेक्षा त्यांचे मताधिक्य कमी झाले होते. या मतदार संघात २०२४ च्या निवडणुकीसाठी काँग्रेसकडून जोरदार तयारी करण्यात येत आहे. खासदार डॉ. हीना गावित यांच्याबद्दल महायुतीतील मित्रपक्षांची नाराजी आणि पक्ष अंतर्गत असलेली धुसफुस याचा सामना करावा लागणार आहे.या मुळे या वर्षी होणारी निवडणूक रंगतदार होण्याची शक्यता आहे.

## मित्र पक्ष आणि पक्षांतर्गत नाराजी

नंदुरबार लोकसभा मतदार संघात भाजपचे नेते डॉ. विजयकुमार गावित आणि त्यांच्या कन्या खासदार डॉ. हीना गावित आणि जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ सुप्रिया गावित यांच्या कार्यपद्धतीवर पक्षांतर्गत आणि महायुतीच्या घटक पक्षात नाराजी आहे. मित्र पक्षांच्या विकास कामांना नेहमी कात्री लावण्याचा आरोप देखील झाला आहे. तर शिंदे गटाचे संपर्क प्रमुख माजी आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी टोलमुक्त असणारा खासदार द्यावा अशी मागणी केली आहे. मित्र पक्षांनी उमेदवार बदलाची मागणी करत उघड नाराजी व्यक्त केली आहे .त्याला भाजपांतर्गत एका गटाच पाठींबा असल्याची चर्चा असल्याने राजकीय वातावरण तापत आहे.

# नरेंद्र मोदी भरकटत चाललेत रोहित पवारांचा थेट निशाणा

**नाशिक | प्रतिनिधी**

नाशिकमध्ये नरेंद्र मोदी यांची सभा झाली. या सभेवर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते रोहित पवारांनी टीका केली आहे. नरेंद्र मोदींच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात शेतकऱ्यांचं इथं भलं झाल्याचं आपण पाहिलाय का? शेतमालाला भाव नाही, बेरोजगारीचं प्रमाण वाढलंय. महिला सुरक्षेचा प्रश्न देशात मोठ्या प्रमाणात वाढत चालला आहे. २०१४ मध्ये मोदींनी सांगितलेले एकही गोष्ट त्यांनी दहा वर्षात पूर्ण केली नाही. शरद पवार आणि उद्धव ठाकरेंवर बोलण्यापेक्षा मोदींनी शेतकऱ्यांसाठी काय केलं हे बोलायला हवं होतं, असं रोहित पवार म्हणाले.

शरद पवारांच्या एका मुलाखतीतील विधानानंतर मित्र पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील का?, अशी चर्चा सुरु झाली आहे. यावर रोहित पवारांनी भाष्य केलंय. या निवडणुकीत भाजप आणि मित्र पक्षांची अतिशय वाईट परिस्थिती होईल, याची नरेंद्र मोदींना भीती वाटतेय. सर्व्हेमध्ये भाजपची पीछेहाट होतानाच दिसतेय. सामान्य कुटुंबांना भाजपने अडचणीत आणलं, असं रोहित पवारांनी म्हटलं.



नरेंद्र मोदींच्या भाषणाची सुरुवात विकासावर केली. नंतर हिंदू मुस्लिमांवर आले. नंतर भटकती आत्मावर आले. नंतर अदानी अंबानीवर आले. आता शरद पवार आणि उद्धव ठाकरेंना ते आमच्याकडे या असं सांगतायत. नरेंद्र मोदी भरकटत चाललेत. आणि सामान्य लोकांच्या हिताचे मुद्दे त्यांच्या भाषणातून बाजूला पडतायेत, असं रोहित पवार म्हणाले.नरेंद्र मोदी आम्हाला नकली म्हणतात. पण नकली कोण आणि असली कोण हे चार तारखेनंतर आपल्याला कळेल. असली लोक हे मतदार आहेत आणि ते असले लोकांच्याच पाठीमागे आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीलाच भरघोस यश मिळेल, असा विश्वास रोहित पवारांनी व्यक्त केला.

## नरेंद्र मोदींच्या सभेवर टीका

नरेंद्र मोदींच्या पिंपळगावच्या सभेत धुळे आणि अहमदनगरहून लोकं आणली गेली होती. मतदार कमी आणि कार्यकर्ते काही प्रमाणात अशी परिस्थिती मोदींच्या सभेला होती. मोदींच्या आजच्या सभेत कुठेही उत्साह नव्हता. मोदींनी देखील भाषण आवरते घेत तिथून काढता पाय घेतला. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोदींच्या सभेत बंदी केली असेल. तर मोदींचा आणि भाजपचा विश्वास मतदारांवर देखील राहिलेला नाहीये. त्यांना फक्त शो बाजी करायची होती. आम्ही सभा घेऊ शकतो हे दाखवायचं होतं, असंही रोहित पवार म्हणालेत.

# रोहिणी खडसे यांचा गुलाबराव पाटलांवर निशाणा म्हणाल्या, तालुक्याचा केला खेळखंडोबा

**जळगाव | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांनी राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्यावर जोरदार टीका केली आहे. तसंच आमदार चंद्रकांत पाटील यांच्यावरही रोहिणी खडसेंनी निशाणा साधला आहे. बोदवडचा पाणीपुरवठा, पाणी उपसा सिंचन योजनेवरून रोहिणी खडसे यांनी सवाल उपस्थित केले आहेत. जल जीवन मिशन योजनेचा बोदवड तालुक्यात खेळखंडोबा झालाय. कॉन्टॅक्टरना काम कसं देता येतील आणि पैसा कसा कमवून घेता येतील यावरच मंत्री गुलाबराव पाटलांचा भर आहे, असं रोहिणी खडसे म्हणाल्या.

बोदवड इथल्या उपसा सिंचन योजनेचे काम पूर्ण आहे. तर दुसरीकडे



दुसरी कुठली उपाययोजना होत नसल्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ आली आहे. याच विषयावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांनी पाणीपुरवठामध्ये गुलाबराव पाटील तसंच मुक्ताईनगरचे आमदार चंद्रकांत पाटील यांच्यावर सडकून टीका केली आहे.

बोधवड तालुक्यातील पाणी प्रश्नावरून रोहिणी खडसे यांनी मंत्री गुलाबराव पाटील आणि आमदार चंद्रकांत पाटील यांच्यावर निशाणा साधला आहे. सत्ताधारी आमदार असताना सुद्धा चंद्रकांत पाटील बोदवड तालुक्यात नागरिकांना पाणी देण्यासाठी कमी पडताहेत, असं म्हणत रोहिणी खडसे यांनी बोदवडच्या पाणीटंचाईच्या विषयावरून आमदार चंद्रकांत पाटील यांच्यावर सुध्दा निशाणा साधला आहे.

गुलाबराव पाटलांवर टीका

पाणीपुरवठा विभागाच्या माध्यमातून सुरू असलेल्या जलजीवन मिशन योजनेचा बोदवड तालुक्यात खेळखंडोबा झालाय. केवळ या योजनेत कॉन्ट्रॅक्टरांना कसे काम देता येतील. पैसे कसे कमवता येतील, यावरच भर दिसतोय, असं म्हणत रोहिणी खडसे यांनी मंत्री गुलाबराव पाटील यांच्यावर निशाणा साधला आहे.

## चंद्रकांत पाटील यांच्यावर निशाणा

आमदार चंद्रकांत पाटील यांच्यावरही रोहिणी खडसे यांनी टीकास्त्र डागलं आहे. चंद्रकांत पाटील हे सत्ताधारी पक्षाचे आमदार आहे. असं असताना बोदवड तालुक्यातील नागरिकांना पाण्यासाठी त्यांनी बोलणं अपेक्षित आहे. त्यासाठी प्रयत्न करणं गरजेचं आहे. मात्र ते कुठल्याही प्रयत्न करताना दिसत नाहीये. पाणी देण्यासाठी ते अपयशी ठरतात. म्हणून नागरिकांचे हाल होत आहेत, असं म्हणत रोहिणी खडसे यांनी चंद्रकांत पाटील यांच्यावर टीकास्त्र डागलं आहे.

# शेतकऱ्यांच्या रोषामुळे बदलले मोदींच्या सभेचे ठिकाण – आ.रोहित पवार

**दिंडोरी | प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या रोषामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदींना प्रचार सभेचे ठिकाण बदलावे लागले असा दावा आमदार रोहित पवार यांनी आज केला. दिंडोरी लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार भास्कर भगरे यांच्या प्रचारासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांची सभा झाली. या सभेनंतर पवारांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी मोदींना टोला लगावला.

भाजपने दिंडोरी मतदारसंघातून डॉ. भारती पवार यांना उमेदवारी दिली असून, त्यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज पिंपळगाव बसवंत येथे सभा होत आहे. केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या विरोधात भूमिका घेतल्यामुळे देशात अनेक आंदोलने झाली. कांदा निर्यात बंदीसारख्या निर्णयामुळे शेतकऱ्यांच्या मनात मोदी सरकारबाबत रोष निर्माण झाला आहे. या रोषाला भाजप तोंड देऊ शकत नाही, यामुळे त्यांनी सभेचे ठिकाण बदलले असे रोहित पवार म्हणाले. दिंडोरी लोकसभा मतदारसंघात छगन भुजबळ, दिलीप बनकर, नरहरी झिरवळ, नितीन पवार आणि सुहास कांदे हे पाच आमदार अजित पवार आणि शिंदे गटाचे आहेत. तर भाजपचा एक आमदार आहे. यामुळे भारती पवार यांना दिंडोरीतून सहज विजय मिळेल असे भाजपला वाटत असले तरी महाविकास आघाडीचे उमेदवार भास्कर भगरे हे भारती पवार यांना तगडे आव्हान देत आहेत, यामुळे ही निवडणूक चुरशीची होणार आहे.

# मुख्यमंत्र्यांचा संवाद गोडसेंना भोवला, खर्च निरीक्षकांची नोटीस

**नाशिक | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोन दिवसांपूर्वी शहरातील उद्योजक आणि विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेत संवाद साधला. नाशिक लोकसभा मतदारसंघाच्या खर्च निरीक्षकांनी या बैठकांची दखल घेत खर्चावरून महायुतीचे उमेदवार हेमंत गोडसे यांना नोटीस बजावली आहे. सदरचा खर्च आपल्या उमेदवारी खर्चात अंतर्भुत का करू नये, असा प्रश्नच नोटीसद्वारे गोडसेंना करण्यात आला आहे. दरम्यान, उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या बैठकीच्या खर्चाची संदिग्धता कायम आहे.

लोकसभेच्या नाशिक व दिंडोरी मतदारसंघासाठी सोमवारी (दि. २०) पाचव्या टप्प्यात मतदान पार पडणार आहे. त्यामुळे अखेरच्या टप्प्यात उमेदवारांकडून स्टार प्रचारकांना पाचारण करून प्रचाराची राळ उडवून दिली जात आहे. सर्वच राजकीय पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांकडूनही ताकद पणाला लावली जात आहे. दोनच दिवसांपूर्वी मुख्यमंत्री शिंदे यांनी नाशिकचा दौरा केला. या दौऱ्यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी दोन स्वतंत्र बैठका घेत विविध संघटनांचे पदाधिकारी व उद्योजकांशी संवाद साधला. या संवादावेळी गोडसे अनुपस्थित होते. परंतु, मुख्यमंत्र्यांनी बैठकांमधूनच थेट गोडसेंच्या विजयासाठी मतांचा जोगवा मागितला. हाच धागा पकडत नाशिक मतदारसंघाच्या खर्च निरीक्षकांनी थेट गोडसे यांना नोटीस बजावली आहे.

# तर परत येणाऱ्या आमदारांचा विचार करु; जयंत पाटील यांचं मोठं विधान

**नाशिक | प्रतिनिधी**

पुलाखालून बरेच पाहणी वाहून गेले आहे. नवीन चेहरे पुढे येत आहेत. तरुण मंडळी चांगलं काम करत आहे. तरुणांना संधी देण्यासाठी शरद पवार हे नेहमीच आग्रही असतात. पण एखाद्या मतदारसंघात अजिबात पर्याय नसेल तर परत येणाऱ्या आमदारांचा त्या मतदारसंघात विचार केला जाईल, असं मोठं विधान शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केलं आहे. जयंत पाटील यांनी अजितदादा गटात गेलेल्या आमदारांसाठी परतीचे दरवाजे उघडे केल्याने हे आमदार त्यांना प्रतिसाद देतात का? याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

जयंत पाटील हे नाशिकच्या येवल्यात आले होते. यावेळी त्यांनी हे विधान केलं. महाराष्ट्रातील जनतेने ही निवडणूक हातात घेतली आहे. जनतेला देशातील संविधान वाचवायचे आहे. महागाई, बेरोजगारीमुळे जनता प्रचंड त्रासलेली आहे. जीएसटी कराची आकारणी चुकीच्या पद्धतीने केली जात आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात इंधनाच्या किंमती कमी असताना गॅस, पेट्रोल, डिझेल महाग झाले आहे. त्यामुळे जनता वैतगाली असून जनतेला महाविकास आघाडी हा महत्त्वाचा पर्याय वाटत आहे. त्यामुळेच आमच्या ३२ ते ३५ जागा निवडून येतील, असा दावा जयंत पाटील यांनी केला आहे.



## प्रशासन काहीच करत नाही

लोकसभा निवडणुकीत पैशांचा पाऊस पडला. त्यावरही त्यांनी भाष्य केलं. लोकसभा निवडणुकीत पैशांचा प्रचंड प्रमाणात पाऊस पडतोय. शेवटच्या दोन-तीन दिवसात सर्व प्रकारचा अवलंब केला जात आहे आणि निवडणूक आयोग डोळे बंद करून बसले आहे. तक्रार करूनही पोलीस प्रशासन कुठेही जात नाही अशा प्रकारचा अनुभव येतोय. कोणतीही कारवाई होत नसल्याची आमची प्रमुख तक्रार आहे. बीड, परळीमध्ये आमच्या उमेदवाराने रिपोलची मागणी केली आहे. मात्र बीडचे जिल्हा प्रशासन काहीच करताना दिसत नाहीये, असं पाटील म्हणाले.

## आम्ही गोंधळ घालणार नाही

पंतप्रधान नरेंद्र मोदी येणार असल्याने आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना अटक करण्यात आली आहे. आज वनी येथे शरद पवारांची तर नाशिक येथे उद्धव ठाकरेंची सभा होणार आहे. सभेला जाऊ नये म्हणून प्रमुख कार्यकर्त्यांना अडकवले आहे. अश्या पद्धतीच्या कारवाईमुळे लोकशाहीचा गळा घोटण्याचे काम चालू आहे. आमचा कोणीही माणूस नरेंद्र मोदींच्या सभेला जाऊन गोंधळ घालणार नाही. आमच्या माणसांना प्रशासनाने मुक्त करावे, अशी मागणी त्यांनी केली.

# सत्तापिपासून भाजपा मृतदेहावरून रॅली काढतंय काय? वडेट्टीवार यांचा सवाल

**मुंबई | प्रतिनिधी**

मुंबईमध्ये होर्डींग दुर्घटना घडली आहे. भ्रष्ट महायुतीमुळे या दुर्घटनेत १८ जणांना जीव गमवावा लागला आहे. तरी देखील भाजपाचे रॅली, रोड शो थांबत नाहीत. सत्तापिपासू भाजपाचा संवेदनशिलपणा संपला आहे. खरंतर ही घटना घडल्यानंतर भाजपने रॅली रद्द करायला हवी होती. पण भाजपाला रॅली काढून आनंद मिळताना दिसतो आहे. अशा शब्दात विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी भाजपावर टिकास्त्र सोडत होर्डींग दुर्घटना स्थळाजवळून पंतप्रधानांची रॅली भाजपा काढत आहे. भाजपा मृतदेहावरून रॅली काढतंय काय? असा संतप्त सवाल देखील विजय वडेट्टीवार यांनी केला.

मुंबई येथील गांधी भवन काँग्रेस पक्ष कार्यालयात विधानसभा विरोधी पक्षनेते विजय



वडेट्टीवार यांची पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली आहे. या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पुढे बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, मुंबईत मोदींचा रोड शो होतोय आणि राज्यात २४ वी सभा घेतली जात आहे. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत सुद्धा एखादा नेता एवढ्या सभा घेत नाही. तेवढ्या सभा या राज्यात मोदी घेत आहेत. याचा अर्थ असा आहे की, राहूल गांधी यांची मोदींना भिती वाटते. महाविकास आघाडी ३५ जागा जिंकणार आहे. त्यामुळे भाजपा घाबरली आहे. नाशिकमध्ये पंतप्रधानांनी सभा घेतली पण कांदा प्रश्नावर ब्र सुद्धा काढला नाही. कांदा उत्पादक शेतकऱ्यांची या राज्यात पिळवणूक केली जात आहे. ही वस्तुस्थिती आहे. विजय वडेट्टीवार पुढे बोलताना म्हणाले की, सध्या मोदींची तळी उचलण्याची स्पर्धा सुरू आहे. त्यामुळे प्रफुल्ल पटेल यांनी पंतप्रधानांच्या डोक्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा जिरेटोप घातला. हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा अपमान आहे. हा जिरेटोप फक्त शिवाजी महाराजांच्या डोक्यावर शोभतो. महाराष्ट्रच्या अस्मितेची जाण पटेलांना नसावी म्हणून हे कृत्य केले आहे. प्रफुल पटेल यांचे दहशवाद्यांशी संबंध होते. असे भाजपाने आरोप केले होते. त्यांच्या मागे ईडी लावली होती. तरी देखील त्यांच्या हातून जिरेटोप कसा परिधान केला,असा सवाल देखील केला आहे. आता जिरेटोप घातल्यानंतर प्रफुल पटेल माफी मागणार आहेत का? असा सवाल करत फक्त ट्वीट करून तुमचा उद्देश सफल होणार नाही असा टोला लगावला. विजय वडेट्टीवार शेवटी बोलताना म्हणाले की, होर्डींग दुर्घटनेला मुंबई महापालिका आणि सरकार जबाबदार आहे. जी क्रेन घटनास्थळी लवकर जायला हवी होती ती काल गेली. आता महायुतीचे पाप लपविण्यासाठी भावेश भिडे नावाच्या व्यक्तीचे फोटो समोर आणले आहेत. कोणाचे फोटो कोणासोबत असू शकतात त्यामुळे काही फरक पडणार नाही. प्रतिमा मलिन करण्याचा भाजपाचा जुना डाव आहे. पण जनता आता भाजपाला ओळखून आहे. या सगळ्या घटनेची उचस्तरीय चौकशी करण्याची मागणी आमच्याकडून केली असल्याचे यावेळी स्पष्ट केले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# महादेव बेटींग अॅपप्रकरणी पुण्यात पोलिसांची धडाकेबाज कारवाई; नारायणगावातून ७० ते ८० जण ताब्यात

**पुणे । प्रतिनिधी**

महादेव बेटिंग अॅप प्रकरणी पुण्यातील नारायणगावमध्ये पोलीसांनी छापेमारी केली आहे. परदेशासह देशातील इतर राज्यातल्या छापेमारी नंतर महादेव ऑनलाइन बेटिंग अॅपची कामं पुण्याच्या नारायणगावामधून सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. यानंतर पुणे ग्रामीण पोलीसांच्या स्थानिक गुन्हे शाखेची नारायणगाव येथे छापेमारी केली. नारायणगावातील एका इमारतीत या काम सुरू असून या प्रकरणात ७० ते ८० जणांना ताब्यात घेतल्याची प्राथमिक माहिती आहे.



परदेशासह देशातील इतर राज्यातल्या छापेमारी नंतर महादेव ऑनलाइन बेटिंग पची पायामुळं पुण्याच्या नारायणगावमध्ये सुरु होती. नारायणगाव शहरातील एका इमारतीत काम सुरु होते. संपूर्ण इमारत महादेव अॅपसाठी वापरत असल्याची माहिती समोर आली आहे. ७० ते ८० जणांना ताब्यात घेतल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. नारायणगाव पोलीस स्टेशनमध्ये तपास सुरु आहे.

अंमलबजावणी संचालनालयाच्या अर्थातच ईडीच्या (ED) विनंतीवरून केंद्र सरकारने महादेव बेटिंग अॅपवर (Mahadev Betting App) बंदी घातली आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने महादेव बुक अॅपवर बंदी घातली आहे. या अगोदर महादेव बेटींग अॅप प्रकरणात अनेक कलाकारांची नावे देखील नावं पुढे आली होती. त्यातच आता मुख्यमंत्र्यांची देखील चौकशी सुरु असल्यामुळे केंद्र सरकारकडून ही मोठी कारवाई करण्यात आलीये.

महादेव बुक अॅप प्रकरणाच्या तपासादरम्यान, ईडीला दररोज नवी माहिती मिळत आहे. या संदर्भात ईडीनं अनेक बॉलिवूड कलाकारांना समन्स बजावलं आणि त्यांना चौकशीसाठी हजर राहण्यासही सांगितलं. ईडीच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणाच्या तपासादरम्यान, आरोपींनी महादेव बुक अॅप आणि त्याच्याशी संबंधित इतर अॅप्लिकेशन्सद्वारे कमावलेल्या कोट्यवधी रुपयांचा वापर करून अमाप मालमत्ता खरेदी केल्याचं उघड झालं आहे. महादेव बुक अॅपचा संस्थापक सौरभ चंद्राकरने (डर्ीीरलह उहरपवीरज्ञरी) मित्र रवी उप्पलसोबत 'महादेव ऑनलाईन अॅप' सुरू केलं होतं. या अॅपवर ऑनलाईन बेटिंग केली जाते. सौरभ चंद्रकारचा फेब्रुवारी २०२३ मध्ये, संयुक्त अरब अमिरातीमध्ये शाही विवाहसोहळा पार पडला. त्याच्या शाही विवाह सोहळ्यात परफॉर्म करण्यासाठी मोठमोठे सेलिब्रिटी आले होते. या लग्नाच्या शाही थाटामुळे आणि खर्चामुळे हे लग्न ईडीच्या निशाण्यावर आलं आणि त्यानंतर मनी लॉन्ड्रिंगचं सर्वात मोठं नेटवर्क उघड झाले.

# डेंग्यूला दूर हटविण्यासाठी परिसरात डासांची उत्पत्ती रोखा -आरोग्य विभागाचे आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

डेंग्यू आजाराला प्रतिबंध करण्यासाठी नागरिकांनी साठवलेल्या पाण्याचे योग्यप्रकारे व्यवस्थापन करावे, डासांच्या उत्पत्तीची ठिकाणे निमार्ण होऊ देऊ नये तसेच आवश्यक दक्षता बाळगावी, असे आवाहन जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालयाने १६ मे रोजी पाळण्यात येणाऱ्या राष्ट्रीय डेंग्यू दिनाच्यानिमित्ताने केले आहे.

डेंग्यू आजाराचा प्रसार हा एडिस इजिप्ती या डासाच्या चावण्यापासून होतो. या डासाची उत्पत्ती साठवणूक केलेल्या स्वच्छ पाण्यात होते. नागरिकांनी आपल्या घरातील पाणी साठवणूकीचे भांडे आठवड्यातून एकदा रिकामे व कोरडे करुन भरावे. एक दिवस कोरडा पाळण्यात यावा. आपल्या घराच्या आजुबाजूचा परिसर स्वच्छ राहील याची काळजी घ्यावी.

डेंग्यूचे रूग्ण नियमित स्वरूपात आढळत असून डेंग्यू आजाराच्या संख्येत ऑगस्ट, सप्टेंबर नंतर वाढ होताना दिसते. काही भागात अतिपाऊस, वाढते शहरीकरण, स्थलांतराचे प्रश्न, विविध विकासकामे अशा अनेक कारणांमुळे डेंग्यू आजाराचे प्रमाण वाढते.

अशा कराव्यात उपाययोजना

डेंग्यू डासांची उत्पत्ती साठविलेल्या पाण्यात होत असल्याने पाणी व्यवस्थापन योग्य रितीने केल्यास डासांची निर्मिती व पर्यायाने हिवताप, डेंग्यूचे प्रमाण कमी होईल. यासाठी घराजवळ असलेले नाले वाहते करून डासोत्पत्ती स्थाने नष्ट करण्यात यावीत. तसेच नष्ट करता न येणाऱ्या मोठ्या डासोत्पत्ती स्थानांमध्ये गप्पी मासे सोडावेत, पाण्याच्या साठ्यांना घट्ट झाकण बसवावे, घरातील कुलर, फ्रीजचा डीप पॅन नियमित स्वच्छ करावा, गटारी वाहती करावीत व छोटे खड्डे, डबकी बुजवावीत, अंगभर कपडे घालावेत, झोपताना मच्छरदानीचा व डास प्रतिबंधक साधनांचा वापर करावा.

आजारांची लक्षणे:

तीव्र डोकेदुखी, डोळ्यांच्या खोबणीत वेदना, सांधेदुखी, अंगावर पुरळ येणे, भूक मंदावणे, उलट्या होणे, उलट्यातून रक्त येणे, तोंडाला कोरड पडणे, रक्तमिश्रित काळसर संडास होणी ही डेंग्यू तापाची लक्षणे आहेत. अशी काही लक्षणे आढळल्यास नजीकच्या जिल्हा सामान्य रूग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रात जावून मोफत रक्त तपासणी करून औषधोपचार घ्यावेत. डेंग्यू आजाराच्या निश्चित निदानासाठी एलायझा टेस्ट ही परिपूर्ण चाचणी एनआयव्ही पुणे व महानगरपालिकेतील सेंटिनल येथे मोफत केली जाते.

डेंग्यू हा आजार नागरिकांच्या सहकार्याशिवाय रोखता येणे शक्य नसल्याने यामध्ये नागरिकांचा सहभाग अत्यावश्यक असून डेंग्यू नियंत्रणासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन सहसंचालक आरोग्य सेवा पुणे डॉ. राधाकिशन पवार यांनी कले आहे.

# जनतेच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न : युगेंद्र पवार

**बारामती । प्रतिनिधी**



लोकसभा निवडणूक प्रचारादरम्यान शहर, तालुक्यातील अनेक नागरिकांनी समस्या सांगितल्या होत्या. त्या आमच्या पद्धतीने सोडविण्याचा प्रयत्न केला जात आहे, अशी माहिती युगेंद्र पवार यांनी दिली. मंगळवारी (दि. १४) त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष कार्यालयात नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. या वेळी त्यांना नागरिकांकडून विविध कामांसंबंधी निवेदने देण्यात आली. या वेळी पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, प्रचारादरम्यान समाजातील विविध घटकांनी काही समस्या मांडल्या होत्या. नोकरी, प्रवेश अशी कामे त्यात अधिक आहेत.

ती सोडविण्याचा प्रयत्न राहील. पक्ष कार्यालयात सुरू केलेला वैद्यकीय मदत कक्ष चांगले काम करीत आहे. कक्ष सुरू केल्यापासून आजवर २० लाखांपर्यंतची मदत गरजूंना मिळवून दिली आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. सक्रिय राजकारणात उतरणार का, या प्रश्नावर त्यांनी उत्तर देणे टाळले. निवडणुकीनंतर माझ्या कुटुंबातील सदस्य परदेश दौ-यावर जातील, अशी टीका उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली होती. त्यावर युगेंद्र म्हणाले, मी बारामतीचा आहे. इतर कोणाला परदेशात जायचे असेल तर त्यात गैर काही नाही.

बारामती लोकसभेसाठी जे मतदान झाले, त्याच्या ईव्हीएम ज्या स्ट्राँग रुममध्ये ठेवल्या, तेथील सीसीटीव्ही कॅमेरे काही काळासाठी बंद होते, अशी तक्रार शरद पवार गटाने केली होती. यावर युगेंद्र पवार म्हणाले, अगोदरच लोक ईव्हीए बद्दल शंका उपस्थित करीत आहेत. त्यात सीसीटीव्ही यंत्रणा बंद पडणे ही गंभीर बाब आहे. निवडणूक आयोग व त्यांच्या यंत्रणेने यासंबंधी आवश्यक ती काळजी घेतली पाहिजे.

# जुन्नरला चाळकवाडी वामनपट्टा येथे बिबट्या जेरबंद

**नारायणगाव । प्रतिनिधी**

वामनपट्टा चाळकवाडी( पिंपळवंडी ता.जुन्नर) येथील दत्ताजी बाबाजी वामन यांच्या शेतात वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या जेरबंद झाल्याची माहिती वनक्षेत्रपाल वैभव काकडे यांनी दिली. पकडलेला बिबट्या नर असून त्याचे वय सुमारे तीन ते चार वर्षाचे असावे. या भागातील जेरबंद करण्यात आलेला हा सहावा बिबट्या आहे,त्याला माणिक डोह येथील निवारा केंद्रात ठेवण्यात आले आहे. पिंपळवंडी, काळवाडी चाळकवाडी त्याचबरोबर पिंपरी पेंढार, उंब्रज क्रमांक एक, उंब्रज क्रमांक दोन या परिसरामध्ये बिबट्यांची संख्या अधिक असून दररोज कुठे ना कुठे बिबट्याचा पाळीव प्राण्यावर हल्ला होत असल्याच्या तक्रारी आहेत.



तसेच पिंपळवंडी येथील लेंडेस्थळ या ठिकाणी अश्विनी हुळवळे या २४ वर्षांच्या विवाहित महिलेला बिबट्याने गंभीर जखमी केले होते. त्यानंतर काळवाडी या ठिकाणी रुद्र फापाळे ह्या आठ वर्षाच्या मुलाला बिबट्याने ठार केले होते.तसेच या घटनेनंतर पिंपरी पेंढार येथील बाजरी पिकाचे राखण करणाऱ्या ४५ वर्षाच्या नानूबाई कडाळे महिलेला बिबट्याने ठार केले होते. त्यामुळे वनविभागाने पिंपळवंडी काळवाडी,पिंपरी पेंढार,उंब्रज या भागात बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरे लावलेले आहेत. वनविभागाचे उपवनसंरक्षक अमोल सातपुते, सहाय्यक उपवनसंरक्षक अमित भिसे, वनक्षेत्रपाल वैभव काकडे व त्यांचे संपूर्ण पथक व बचाव पथक( रेस्क्यू टीम) त्या परिसरामध्ये तळ ठोकून आहे.

थर्मल ड्रोन कॅमेरा च्या साह्याने उसाच्या क्षेत्रामध्ये बिबट्याची पाहणी केली जात आहे. तसेच काही ठिकाणी ट्रॅप कॅमेरे देखील लावण्यात आले आहेत. नागरिकांनी सकाळी नऊच्या आत दुपारी पाचच्या नंतर एकटे बाहेर पडू नये असे आवाहन वनविभागाच्या वतीने करण्यात आले आहे. दरम्यान पिंपळवंडी या ठिकाणी पकडलेला बिबट्या माणिकडोह येथील निवारा केंद्रामध्ये ठेवण्यात आला असून तो नरभक्षक बिबट्या आहे किंवा कसे याबाबतची सुद्धा खातर जमा केली जाणार आहे.

काळवाडी या ठिकाणी रुद्र फापाळे या आठ वर्षाच्या मुलावर बिबट्याने हल्ला करून त्याला ठार केल्यानंतर पकडलेले बिबटे यापुढे सोडून दिले जाणार नाहीत असे उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांनी सांगितले होते. तसेच पिंपरी पेंढार या ठिकाणी बाजरीचे राखण करणाऱ्या नानीबाई कडाळे या ४५ वर्षाच्या महिलेला बिबट्याने ठार केल्यानंतर नरभक्षक बिबट्याला ठार केले जाईल अशी माहिती देखील वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी स्थानिक नागरिकांना दिली होती. त्यामुळे पिंपरी पेंढारची घटना झाल्यानंतर पकडलेले बिबट्या नरभक्षक आहेत का? आणि नरभक्षक असेल तर त्यांना गोळ्या घालून ठार करणार का? याबाबतची विचारणा होऊ लागले आहे. दरम्यान जुन्नर तालुक्यामध्ये बिबट्यांची संख्या कमी होण्याचे काही नाव घेत नाही. बोरी १४ नंबर, भोरवाडी, कांदळी वडगाव, येडगाव या भागामध्ये बिबट्यांचा वावर मुक्त पद्धतीने सुरू असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे या परिसरात देखील वन खात्याने पिंजरे लावावेत अशी मागणी पुढे येत आहे. तसेच पकडलेले बिबटे कोणत्याही परिस्थितीमध्ये सोडून दिले जाऊ नयेत आणि सोडायचे असतीलच तर ते ताडोबा सारख्या जंगलात सोडले जावेत अशी ही मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. दिवसाही बिबट्याचे दर्शन होऊ लागल्याने शेतकऱ्यांना शेतामध्ये काम करणे अवघड होऊन बसले आहे.

# आयटी ट्रेनिंग सेंटरमध्ये काम करणाऱ्या समुपदेशक महिलेला तोकडे कपडे घालण्याची सक्ती

**पुणे । प्रतिनिधी**

कोथरूड परिसरातील एका आयटी ट्रेनिंग सेंटरमध्ये काम करणाऱ्या समुपदेशक महिलेला तोकडे कपडे घालण्याची सक्ती करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. यासोबतच तिच्या शरीराच्या ठेवणीवरुन देखील अश्लील शेरेबाजी करून विनयभंग करण्यात आला. ही घटना ८ मे २०२४ ते १४ मे २०२४ या कालावधीत घडली. याप्रकरणी कोथरूड पोलिसांनी सेंटरचालकावर गुन्हा दाखल केला आहे.

महेश गंगाधर कनेरी (रा. लोटस लक्ष्मी, विकासनगर, वाकड) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्यावर भादवि ३५४ (अ), ३५४ (ड), ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी निगडी येथे राहणाऱ्या २७ वर्षीय पिडीत महिलेचे फिर्याद दिली आहे. कोथरूड पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी महेश कनेरी हा कोथरूड गावठाणात असलेल्या बालाजी कॉम्प्लेक्समध्ये 'गामाका ए आयआयटी' ट्रेनिंग सेंटर चालवतो. या ठिकाणी माहिती तंत्रज्ञान क्षेत्राशी संबंधित कोर्सेस शिकवले जातात. या सेंटरमध्ये पिडीत महिला शैक्षणिक समुपदेशक म्हणून काम करते. ती नुकतीच या ठिकाणी नोकरीस लागली आहे.

आरोपी कनेरी याने या महिलेला एकटे गाठले. तिला, 'तु अशा कपड्यांमध्ये का आली आहेस? अशी विचारणा करीत या संस्थेत कामावर येताना डिपनेक आणि शॉर्ट ड्रेस घालून यायचे असते हे माहिती नाही का अशी विचारणा केली. वास्तविक या सेंटरमध्ये तसा कोणताही ड्रेस कोड नसताना देखील या महिलेला तोकडे कपडे घालण्यासाठी सक्ती करण्यात आली. तसेच, तिला तिच्या शरीरावरून शेरेबाजी करीत तिला जीमला जाण्याचा सल्ला दिला. तसेच, तिला बिझनेस मिटींगसाठी हॉटेलमध्ये येण्याबाबत विचारणा केली. दुसऱ्या मुली माझ्यासोबत येत असतात असे सांगत तिला पैशांची काही कमी पडणार नाही असे म्हणत पैशांचे आमिष दाखवले. तिच्याशी अश्लील संवाद साधत विनयभंग केला.

याबाबत कोथरूड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संदेश देशमाने म्हणाले, की पिडीत महिलेच्या तक्रारीनंतर तात्काळ गुन्हा दाखल करून घेण्यात आला आहे. आरोपीला सीरीआरपीसी कलम ४१ नुसार चौकशी आणि तपासासाठी हजर राहण्याची नोटीस देण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

# यशदा येथे विज्ञान आणि नैसर्गिक शेती या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन

**पुणे । प्रतिनिधी**

कृषी व शेतकरी कल्याण विभाग, भारत सरकार व कृषी विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने नैसर्गिक शेतीबाबत विज्ञान आणि नैसर्गिक शेती या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेचे यशदा येथे १६ मे रोजी सकाळी ९.३० ते संध्या. ६ या वेळेत आयोजन करण्यात आल्याची माहिती कृषी संचालक (आत्मा) दशरथ तांभाळे यांनी दिली आहे.

कार्यशाळेला भारत सरकारच्या कृषी विभागातील सह सचिव (आयएनएम), देशाच्या पश्चिम भागातील राज्यांचे कृषी सचिव, आयुक्त, संचालक, आयसीएआरचे शास्त्रज्ञ, चार कृषी विद्यापीठांचे कुलगुरू, केंद्रिय कृषी मंत्रालयातील अधिकारी, निवडक शेतकरी उपस्थित राहणार आहेत.

या कार्यशाळेत नैसर्गिक शेतीबाबतचे धोरण आणि त्याअनुषंगाने राबविण्यात येणाऱ्या योजनेबाबत चर्चा होणार असून यात महाराष्ट्रासह मध्य प्रदेश, गुजरात, कर्नाटक, केरळ, गोवा, दादरा आणि नगर हवेली आणि दमण व दिव आणि लक्षद्वीप या ८ राज्य व केंद्रशासित प्रदेशातील २५० शास्त्रज्ञ, अधिकारी व शेतकऱ्यांचा सहभाग असणार आहे, असेही कळविण्यात आले आहे.

# पळसदेवला वादळी वाऱ्याने ८ बगळ्यांचा मृत्यू, १२ जखमी

**इंदापूर । प्रतिनिधी**

पळसदेव (ता. इंदापूर) परिसरात सोमवारी (दि. १३) रात्री झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसाने अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली, त्यामध्ये ५० हून अधिक राखी बगळे (ग्रे-हेरॉन) अडकून पडले होते. मात्र ८ बगळ्यांचा मृत्यू झाला, तर १२ बगळे जखमी झाले, यामध्ये पिल्लांचाही समावेश आहे. घटनेची माहिती मिळताच वन विभागाची रेस्क्यू टीम तातडीने घटनास्थळी दाखल झाली आणि मृत व जखमी बगळे ताब्यात घेत उपचार केले. पळसदेव येथील जुन्या पुणे-सोलापूर महामार्गावरील रस्त्यानजिकच्या उंच सुबाभळीच्या झाडावर शेकडो राखी बगळ्यांनी घरटी तयार केलेली आहेत. त्यामध्ये अनेक बगळ्यांनी पिल्लांना जन्म दिला आहे. काही पिल्ले उडण्याच्या अवस्थेत होती, तर काही अंड्यातून बाहेर पडण्याच्या अवस्थेत होती.

मात्र सोमवारी रात्री साडेनऊ ते १० वाजण्याच्या दरम्यान जोरदार वादळी वाऱ्यासह मध्यम स्वरूपाचा पाऊस पडला. यामध्ये हे सुबाभळीचे झाड उन्मळून पडले आणि त्यामध्ये ५० पेक्षा अधिक बगळे अडकून पडले. यातील अनेक बगळ्यांना येथील स्थानिक पक्षीमित्रांनी झाडातून सुरक्षित काढले. मात्र ८ मोठे बगळे मृत्युमुखी पडले, तर इतर १२ बगळे गंभीर जखमी झाले. यामध्ये पिल्लांचाही समावेश आहे. या घटनेची माहिती दैनिक 'पुढारी'चे वार्ताहर प्रवीण नगरे यांनी वन विभागाला दिली. त्यानुसार वन विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी अजित सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक सनी कांबळे, महादेव झोळ, केशव चव्हाण यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तत्काळ दौंड येथील रेस्क्यू टीमला पाचारण केले. दरम्यान पोलिस पाटील अनिल कुचेकर, रमेश काळे, प्रताप काळे, बलभीम भोई, आबा गायकवाड, सोमनाथ भोई यांनी झाडांमध्ये अडकलेल्या अनेक बगळ्यांना बाहेर काढून त्यांना पाणी पाजून सुरक्षित ठिकाणी ठेवले. त्यानंतर दौंड येथील रेस्क्यू पथक घटनास्थळी दाखल झाली. त्यांनी सर्व सर्व बगळे ताब्यात घेतले व यातील जखमींवर प्राथमिक उपचार केले तर काहींना पुढील उपचारासाठी पुण्याला नेले.

# सुरेल, सुश्राव्य गायन-वादनाने सांगीतिक समारोह संस्मरणीय गांधर्व महाविद्यालय, पुणेच्या ९२व्या वर्धापन दिनानिमित्त गायन-वादन मैफल

**पुणे । प्रतिनिधी**

'टप्पा', 'तराणा', 'त्रिवट', 'ठुमरी' तसेच विविध रागातील बंदिशींच्या सादरीकरणाने गांधर्व महाविद्यालय, पुणेच्या ९२व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित विशेष सांगीतिक समारोहातील तिसरा दिवस संस्मरणीय ठरला.

विष्णु विनायक स्वरमंदिरात या सांगीतिक समारोहाचे आयोजन करण्यात आले होते. उद्योजक दीपक देसाई आणि सरिता देसाई यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात सुप्रसिद्ध शास्त्रीय गायिका अपर्णा केळकर यांनी गुरू पंडित सी. आर. व्यास रचित मालिनीताई राजुरकर यांच्या आवडीची मारुबिहाग रागातील 'मोरे नैनवा तरस गए रि निठुर पिया बाट तकत' ही रचना सादर करून केली. त्यानंतर गुरू डॉ. अरविंद थत्ते यांच्या सरगम गीतावर आधारित तराणा अतिशय प्रभावीपणे सादर करून रसिकांना आनंदानुभूती दिली. द्रुत एकतालात तबला आणि पखवाजाचे बोल दर्शविणारा गुरू डॉ. अरविंद थत्ते रचित दुर्गा रागातील द्रुत एकतालातील त्रिवट सादर करून अंतऱ्यात त्याच्या विविध लयी समर्थपणे दर्शविल्या. सादरीकरणाची सांगता खमाज रागातील पारंपरिक टप्पा व त्याला जोडून द्रुत तीनतालात तराणा सादर करून केली. अपर्णा केळकर यांनी सुमधूर, सुरेल व बहारदार गायनाने मैफलित रंगत आणली. प्रशांत पांडव (तबला), सौमित्र क्षीरसागर (संवादिनी), गार्गी काळे, वर्षा लाटे (तानपुरा) यांनी समर्पक साथ केली.




अपर्णा केळकर, सावनी शेंडे, यांचे गायन तर पंडित प्रमोद मराठे, रोहित मराठे यांचे संवादिनी वादन

यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य पंडित प्रमोद मराठे यांचे एकल संवादिनी वादन झाले. त्यांनी पंडित बळवंतराय भट्ट रचित बंदिशी व तराणे यांची झलक आपल्या वादनातून रसिकांना दर्शविली. तसेच बिहाग रागातील आडाचौताल सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. पंडित मराठे यांचे शिष्य रोहित मराठे यांनी आपल्या एकल संवादिनी वादनात राग यमन, देस, बसंतबहारमधील विविध रचना अतिशय प्रभावीपणे सादर करून रसिकांना मोहित केले. पंडित प्रमोद मराठे आणि रोहित मराठे यांना प्रशांत पांडव यांनी तबला साथ केली.

कार्यक्रमाची सांगता सुप्रसिद्ध गायिका सावनी शेंडे यांच्या बहारदार गायनाने झाली. मध्यलय रूपक तालातील 'आनंद मनाओ मोरा पिया घर आया' या बंदिशीला जोडून मध्यलयीतील 'तू मोरा सैंया निपट अनाडी' ही राग धानीमधील बंदिश सादर केली. त्यानंतर काशीनाथ बोडस रचित बसंतरागातील 'मधुकर आज बसंत बधाई' ही रचना सादर करून रसिकांची मने जिंकली. गुरू विणा सहस्त्रबुद्धे यांचे संवेदनशील मन दर्शविताना राग बागेश्रीमधील 'श्याम घन छाये' ही रचना प्रभावीपणे सादर केली. त्यानंतर 'दुर्गे भवानी दया कर माता' ही वीणा सहस्त्रबुद्धे यांनी अजरामर केलेली रचना ऐकवून स्त्रीशक्तीचे रूप दर्शविले. सुप्रसिद्ध ठुमरी सम्राज्ञी शोभा गुर्टू यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून सावनी यांनी 'बेदर्दी बन गये मोरे सैया' ही मिश्र हंसध्वनी रागातील ठुमरी सादर केली. तसेच आपल्या आजी कुसुम शेंडे व वडिल डॉ. संजीव शेंडे यांना शोभा गुर्टू यांनी शिकविलेली 'चला है परदेसीया नैना मिलाके' ही मिश्र भैरवी रागातील पारंपरिक रचना सादर करून सावनी यांनी आपल्या मैफलीची सांगता केली. सावनी यांचे सुश्राव्य, बहारदार गायन रसिकांसाठी पर्वणी ठरले.

अरुण गवई (तबला), पंडित प्रमोद मराठे (संवादिनी), राधिका हेगडे, प्रिती पंढरपूरकर (तानपुरा, सहगायन) यांनी समर्पक साथ केली.

कलाकारांचा सत्कार दीपक देसाई, सरिता देसाई यांच्या हस्ते करण्यात आला. तर मान्यवरांचा सत्कार कोषाध्यक्ष डॉ. मोहन उजगांवकर यांच्या हस्ते करण्यात आला. सूत्रसंचालन मिलिंद कुलकण यांनी केले.

डॉ. संजीव शेंडे यांनी ठुमरी, दादरा, होरी या गीत प्रकाराचा पुण्यात मोठ्या प्रमाणावर प्रसार केला. त्यानिमित्त डॉ. शेंडे यांचा तसेच संगीत क्षेत्रातील योगदानाबद्दल आणि वयाच्या पंचाहत्तरीनिमित्त गोविंदराव बेडेकर यांचा सत्कार उद्योजक दीपक देसाई यांच्या हस्ते करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना डॉ. संजीव शेंडे म्हणाले, गांधर्व महाविद्यालय, पुणेचे कार्य पंडित प्रमोद मराठे व परिणिता मराठे यांनी उच्च कोटीला नेऊन ठेवले आहे. या महाविद्यालयात कलाकाराची उत्तम जडण-घडण होते. ठुमरी, दादरा, होरी या गीत प्रकाराचा प्रसार करण्यात माझा खारीचा वाटा आहे. उपशास्त्रीय संगीत शिकताना शास्त्रीय संगीताचा पाया पक्का असावा लागतो तसेच या गीत प्रकारांचा बाज वेगळा असल्याने ब्रज, उर्दू अशा भाषांचा लहेजाही शिकणे आवश्यक असते. गोविंदराव बेडेकर यांनीही मनोगत व्यक्त केले.

प्रमुख अतिथी दीपक देसाई म्हणाले, भारतीय शास्त्रीय संगीताचा दबदबा जगभरात निर्माण झाला आहे. हे संगीत मनाला भुरळ घालते. संगीतातून भावनांचे प्रकटीकरण होते तसेच ताण-तणाव, शारीरिक वेदनांमधून आराम मिळतो. या मुळेच संगीत हे मानवासाठी मोठे वरदान ठरले आहे.